म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ९१५४
सं. क्र. ८८३

REFBK-0004507
REFBK-0004507

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८७३
९७९३९

स्वयंप्रत
माचें चवथें पुस्तक.

# महाराष्ट्र - गीतांजलि.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणें

अनुवादक,

दे. ल. महाजन.

REFBK-0004507
REFBK-0004507

किंमत ] [ ०१२

# महाराष्ट्र-गीतांजलि.

प्रस्तावना- लेखकः- रामचंद्र गोविंद कानडे (वाङ्मयविशारद)

अनुवादकः- देविदास लक्ष्मण महाजन, नांदेड.

REFBK-0004507

मुद्रक:- नारायण नरसिंह फडणीस,
बावजी प्रिंटिंग प्रेस जळगांव.



प्रकाशक:-- दे. ल. महाजन,
नांदेड (निजाम स्टेट)

‘गीतांजली’ चे प्रणेते



कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर.

प्रस्तुत कृतीचे प्रेरक

## प. वा. गणेश गोपाळ गाळेगांवकर

बी. ए. एलएल-बी.

REFBK-0004507

REFBK-0004507



यांच्या पुण्य पावन स्मृतीस

**समर्पण.**

# प्रास्ताविक.

आशिया खंडाचे कविसम्राट आणि हिंदी संस्कृतीची महति युरोपियन राष्ट्रांपुढें मांडण्यासाठीं अहर्निश खटपट करणारे वंग कविवर्य **रवींद्रनाथ** ठाकूर (टागोर) यांच्या सर्वमान्य अशा '**गीता-अलि**' या काव्यग्रंथाचा परिचय महाराष्ट्र वाचकांना नव्यानें करून देण्याची आतां आवश्यकता मुळींच नाहीं. मराठी वाचकांना चिरपरिचित असलेले कादंबरीकार कै. **हरिभाऊ** आपटे आणि कै. रा. **गोविंदराव** कानिटकर यांनीं गीतांजलिचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध केलीं. त्यानंतर कित्येक मासिकांतून आणि लेखांतून गीतांजलींतील कांहीं गीतपुष्पांचीं कवितावद्ध रूपांतरें प्रगट झालीं आहेत. यापूर्वींहि खुद्द काव्यरत्नावलींतून कवि **माधवानुजांनीं** गीतांजलिच्या कांहीं भागाचें कवितावद्ध भाषांतर केलें आहे. पण हीं कवितावद्ध भाषांतरें अपुरींच आहेत. इंदुरचे डॉ० **शारंगपाणी** आणि **ऋग्वेदी** यांचीं दोन कवितावद्ध भाषांतरें नुकतींच प्रसिद्ध झालीं आहेत. समवृत्तांत--अभंग वृत्तांत झालेले श्री. **ऋग्वेदी** यांचें भाषांतर चांगलें आहे. नांदेडचे श्री. **दे. ल. महाजन** यांनीं नुकतेंच काव्यरत्नावलींतून सुबोध व साकी वृत्तांत रचलेलें '**महाराष्ट्र-गीतांजलि**' हें भाषांतरहि सुरेख व हृदयाल्हादक झालें असून मूळ काव्यांतील स्वारस्य आणि गोडी बऱ्याच प्रमाणांत भाषांतरांत उतरली आहे; ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे.

श्री. **महाजन** यांचा परिचय 'महाराष्ट्र-गीतांजलिच्या द्वारेंच महाराष्ट्र वाचकांना आज नव्यानेंच करून देण्याची आवश्यकता नाहीं. **ज्ञानेश्वरादि** कित्येक साधुसंतांनीं पुनीत केलेल्या पैठण, बीड, अंबे [जोगाईचे] नांदेड वगैरे फार प्राचीन काळच्या महाराष्ट्र-भागांत-अर्थात् मराठीच्या माहेरघरांत बसून त्यांनीं आज बरींच वर्षें वाङ्मयसेवा चालविली आहे.

देशकालपरत्वें या प्राचीन महाराष्ट्राची आणि प्रस्तुतच्या महाराष्ट्राची कांहीं बाबतींत ताटातूट झाल्यामुळें आणि अशा फरकामुळें या मोंगलाईतील

महाराष्ट्रीयांकडे प्रस्तुत महाराष्ट्रीयांचें जावें तितकें लक्ष जात नाहीं. पण आतां पूर्वीचा एकलकोंडेपणा दूर झाला असून आतां मराठी बोलणारे सर्व प्रांत राजकीयदृष्ट्या नाहींतरी सांस्कृतिकदृष्ट्या तरी एकवटूं लागले आहेत. आतां येतें साहित्य-संमेलन तर खुद्द या हैद्राबाद संस्थानांतच भरत असल्यामुळें आजपर्यंत विभक्त बनलेल्या आमच्या साठ लाख मराठी बांधवांची भाषिकदृष्टीनें एकजूट होत आहे. श्री. महाजन यांनीं यापूर्वी 'काव्यमय नामदेव चरित्र' लिहिलें आहे. त्यांच्याच संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होणारी **आख्यानरत्नमाला** हीहि तशीच उज्ज्वल आहे. नांदेड येथें प्रसिद्ध होणाऱ्या 'विहंग मालेशी' त्यांचा लेखक या नात्यानें संबंध आहे. असो.

सध्यांच्या गीतांजलींत मूळ 'नैवेद्य, खेया' वगैरे लहान लहान काव्य-खंडांतील कांहीं निवडक गीतें रवींद्रनाथांनीं भाषांतरून घेतलीं आहेत. सदर काव्यात परमेश्वराचें आध्यात्मिक स्वरूप ओळखून त्या निर्गुण निराकाराचें आपल्या प्रेमळ भाषेंत वर्णन केलें आहे. परमेश्वर उत्पत्ति-स्थिति-लयकर्ता आहे, जगांतील श्रेय व प्रेम तोच, जगांतील सौंदर्य. कला आणि ज्ञान हे [ गुणत्रय ] एकट्या परमेश्वराचे ठिकाणीं समावले आहेत. जगांतील प्रत्येक वस्तूंत परमेश्वराचें अधिष्ठान आहे ही परमेश्वरविषयक भावना वेदकालांपासून चालत आलेली आहे. याच वेदमुनींच्या कल्पनांना कविवर्य रवींद्रनाथ यांनीं नव्या मुशींत घातल्यामुळें त्यांचें तेज जास्तच खुलून दिसतें. जगाच्या संत-वाङ्मयांत या दृष्टीनें हिंदी साधूसंतांच्या वाङ्मयाचें महत्व फारच मोठें आहे.

परमेश्वर व भक्तकवि यांचा परस्पर संबंध किती जिव्हाळ्याचा आहे हें त्यांचीं काव्यें वाचणाऱ्यांना निराळें सांगण्याचें कारण नाहीं. साधुसंतांचीं गोड वचनें वाचतांना याचा अनुभव सहज येईल. या ठिकाणीं परमेश्वर त्राता आहे, भक्तकवि दीनदुबळा आहे असें मानलें आहे. जगांत दीनदुबळ्यांचा आतं परमेश्वरच आहे.

जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुलें
तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा.

या कव्युक्तींत ह्मटल्यासारखीच वृत्ति रवींद्रनाथांच्या काव्यांत आढळून येते. रवींद्रनाथ ह्मणतात--

माझ्या हृदयीं दैन्य सदा जें मूळ धरूनी राहे
घाव घाल तूं त्यावर, माझी अशी प्रार्थना आहे ३६
गरिबांची ती कधीं उपेक्षा मजकडुनी न घडावी
प्रबलोन्मत्तांपुढतीं माझी मान न कधिं वाकावी ३८
असार हा संसार गणुनि मन विटेल तैं त्वां यावें
गोड अशा त्वत्प्रेमळभजनीं रंगवुनी सोडावें. ३९
हे नाथा या सर्व जनांच्या तूं पाठीमागून
कोठें असशी उभा राहिला छायेमाजी लपुन
धूलीनें त्या भरल्या मार्गीं जाती ते जवळून
किंबहुना तुज दूर लोटिती नाहींसच समजून
किती प्रहर मी इथें भटकलों वाट तुझी पाहून
इथें ठेविली आहे पूजासामुग्री मांडून ४१

इतकी तयारी करून कवि परमेश्वराची वाट पाहात बसला आहे; अशा ोराज्यांत कवि दंग होऊन गेला असतां तो परमेश्वर अदृश्य स्वरूपांत ीच्या सन्निध आला. यावेळीं त्याला परमेश्वराचें भान नव्हतें. कवि नंतर ्दम भानावर येऊन ह्मणतो--

त्या माझा कर धरुनि धुळींतुनि मजला उचलायास
सिंहासन निज सोडुनि देवा! खालीं तूं आलास
नामघोष हे करित वाजवित टाळ समारंभानें
कितितरि मेळे दिंड्या जाती मजपुढती थाटानें

अंधारीं या सर्वांच्याही मागें ठेवुनि पाय
उभें रहाया गुप्त इच्छिसी एकटाच तूं काय ?

असें हा भक्तकवि परमेश्वराला प्रश्न विचारून तेथें उभा आहे.

परमेश्वराची प्राप्ति करून घेण्यासाठीं कवि अशा प्रकारें तळमळत आहे, लहान मुलाच्या निष्पापवृत्तीप्रमाणें त्याची वृत्ति परमेश्वराकार बनली आहे; आणि त्याप्रसंगीं एकदम उपरति होऊन तो परमेश्वर मीच [ सोऽहं ] अशा भावनेनें कवि तदाकार झालेला या गीतांजलींत प्रतिक्षणीं दिसत आहे. आत्मसाक्षात्कार अथवा स्वानुभूति झाल्यानंतर कवीच्या लेखणींतून बाहेर पडलेलीं हीं स्वर्गीय गीतकुसुमें इहलोकींच नव्हे तर स्वर्लोकींहि सुत्रासी ठरल्यावाचून राहाणार नाहींत.

हीं गीतें रवींद्रनाथांनीं आपल्या हातांनीं खुडून घेऊन ही गीतांजली जेव्हां प्रभुचरणीं वाहिली तेव्हां व त्यापूर्वींहि या गीतांचा सुवास भरतखंडांत आणि इतरत्र दरवळला आणि कस्तूरिकामोदाप्रमाणें हजारों गानप्रिय व गंधप्रिय वाचकलुब्धकांना त्यांच्या काव्यानें मृगाप्रमाणें आपल्या मागें वेगानें धावावयास लावलें. सत्काव्याची हीच खरी कसोटी व हेंच खरें सुलक्षण !

अशा रीतीनें रवींद्रनाथ हे साक्षात्कारी कवि झाल्यावर त्यांच्या परिणत बुद्धिमत्तें-तून जीं गीतकुसुमें बाहेर आलीं तीं सुंदर आहेत. तीं बहुतांशीं भक्तिपर आहेत.

सत्कवीची वृत्ति एखाद्या निष्कपटी बालकाप्रमाणें असते असें ह्मणतात. रवीबाबूंच्या बाबतींत हें अक्षरशः खरें आहे. गीतांजलीमध्यें अशा कित्येक कविता आहेत कीं ज्यामध्यें परमेश्वरास कवीनें मातापित्याप्रमाणें मानून त्याच्याशीं लहान मुलाप्रमाणें लडिवाळपणा चालवला आहे. एका ठिकाणीं या बाबतींत कवि ह्मणतोः--

माते ! तूं जे त्यास घातले अलंकार शृंगार
आरोग्यप्रद धूलिकणा तें तेणें अंतरणार
प्रपंचरूपीं महोत्सवाचा मिळेन त्या जरि भोग
शृंगाराचा, आभरणाचा काय बरें उपयोग ?

रवींद्रनाथांच्या या काव्यांतील राष्ट्रप्रेमनिदर्शक कविताहि फार सुंदर आहेत त्यांची प्रसिद्ध कविता ह्मणजे--

हे परमात्मन्! जेथें न शिवे भीति मनाला कांहीं
डोकें करुनी वर चालाया शंका वाटत नाहीं
जेथें असती मार्ग मोकळे ज्ञानाच्या प्राप्तीचे
संकोचानें तुकडे तुकडे झाले नच जनतेचे
शुद्ध अशा त्या सत्यावाचुनि शद्ब न जेथें वायां
हात पसरितो उद्यम संतत पूर्णतेस मिळवाया
मृतरूढीच्या भयाण पुलिनीं पावुनिया लोपाला
प्रज्ञेचा तो निर्मळ निर्झर लुप्तप्राय न झाला
कृपाप्रेरणा तुझीच कारण ज्या आचार विचारा
होउनि तद्विस्तार, मनाच्या प्रगतिस मिळतो थारा
प्रभो! अशा त्या स्वतंत्रतेच्या स्वर्भूमाजी तरता!
होवो माझा देश निरंतर जागृत सत्वर आतां

श्री. महाजन यांनीं या कवितेचें भाषांतरहि फारच सुबोध व सरळ केलें आहे.

असो. रवींद्रनाथांच्या गीतांजलीच्या मराठी कृतीशीं पुनः एकवार परिचय करून घेण्याची संधि आणून दिल्याबद्दल प्रस्तुत ठिकाणीं कवि महाजन यांचे आभार मानले पाहिजेत. मराठींत गीतांजलीचीं अनेक गद्य पद्य भाषांतरें असतां आपलीहि एक सुंदर ' महाराष्ट्र-गीतांजलि ' शारदेस अर्पण करण्यासाठीं कवीनें तयार केली; यावरून गीतांजलीविषयींचें त्यांचें प्रेम जास्तच वृद्धिंगत होत आहे. महाराष्ट्र-गीतांजलिचा प्रेमानें स्वीकार करतील अशी इच्छा व्यक्त करून ही थोडी लांबलेली प्रस्तावना मी येथेंच पुरी करितों.

मुंबई २५-२-३१

रामचंद्र गोविंद कानडे
(वाङ्मयविशारद)

६ ४५०७

# अनुवादकाचें अंतरंग.

आठ दहा वर्षांपूर्वींची गोष्ट. महाराष्ट्रसाहित्यांतील केवळ काव्यशाखे-करितां स्वतःस वाहून घेतलेल्या '**काव्यरत्नावली**' च्या संपादकांनीं-श्री. **नारायण नरसिंह फडणीस**-यांनीं-होतकरू कवींच्या त्रुटित काव्यरचनेचा अतिरेक पाहून ह्मणा किंवा खंडकाव्य अथवा महाकाव्य रचण्याची प्रवृत्ति लोपत चाललेली पाहून तिला चालना देण्याच्या सद्धेतुनें ह्मणा काव्यरत्नावलींतून एक जाहीरात दिली होती. हजार दीडहजार ओळींची कविता लिहिणारास तिच्या मान्यतेप्रमाणें योग्य तें पारितोषक दिलें जाईल असा त्या जाहिरातीचा आशय होता. ही जाहीरात माझे मित्र श्री. **गणेश गोपाळ गोळेगांवकर** बी. ए. एल् एल्. बी. **हैद्राबाद** यांच्या पाहाण्यांत आली. त्यावेळीं माझें '**नामदेव चरित्र**' नुकतेंच प्रसिद्ध झालें होतें. पारितोषकाच्या दृष्टीनें नव्हें तर आपल्या प्रांतांतील आपल्या एका स्नेह्यास महाराष्ट्रांतील रसिकांपुढें आणण्याच्या आत्मीय बुद्धीनें त्या सुसंधीचा उपयोग करून घेण्याविषयीं त्यांनीं मला सुचविलें. कवींच्या आखाड्यांत शर्यतीनें उतरण्याची माझी तितकी योग्यताहि नव्हती व हौसहि नव्हती; तरी त्यांच्या प्रेमाग्रहामुळें त्यांच्या ह्मणण्याचा मला विचार करावा लागला. ते पडले कट्टे Rationalist व सुधारक आणि मी पडलों 'सगुण चरित्रें परमपवित्रें हरिचीं वर्णिणारा' भाविक भाट. त्यांच्या राष्ट्रीय दृष्टीला पोषक होणारा व माझ्या भाविक वृत्तीला बाधक न होणारा असा विषय त्यांनीं सुचवणें व मीं स्वीकारणें त्यावेळीं शक्य होतें. अराष्ट्रीय देवभक्ति त्यांना नको होती व अभाविक राष्ट्रभक्तिचा मला ओढा नव्हता. राष्ट्रभक्ति व देशभक्ति या दोन्ही गोष्टी एकसमयावच्छेदानें ज्यांत संमिश्र होतील अशा शिक्षणाचा विचार करतां डॉ. **रवींद्रनाथांची 'गीतांजली'** त्यांच्या दृक्पथांत आली व त्यांनीं तिला मातृभाषेच्या परडींत घालून रसिक व भाविक महाराष्ट्रीयापुढें ठेवण्यास मल सांगितलें आणि त्या गीतकुसुमाभोंवतीं

दरवळणाऱ्या परिमळाच्या अल्प परिचयानें मीहि लुब्ध होऊन आनंदानें त्या प्रयत्नास प्रवृत्त झालों. मी आपल्या मंगदुराप्रमाणें '**गीतांजली**' ला मराठी लेणें चढविलें व तें माझ्या मित्रास आवडलें. मुदतीच्या आंत लेखी प्रत **काव्यरत्नावलीकडें** पोंठविली गेली.

पुढें बऱ्याच दिवसानंतर शोध घेतां रा फडणीसाकडून कळलें कीं प्रयत्न करणारांत एकटा मीच असल्यामुळें जाहिरातीचा निकाल लावण्यांस अडचण पडत आहे. तथापि निकाल हें माझें उद्दिष्ट नव्हतेंच. माझी कृती रसिकापुढें कशी व केव्हां येईल एवढाच काय तो प्रश्न माझ्यापुढें होता. नंतर माझे हितचिंतक सन्मित्र कवि कै० **दत्तात्रय अनंत आपटे [अनंततनय] पुणें** यांच्या अवलोकनांत माझी वृत्ति आली व ती त्यास रुचलीहि. ती प्रमादरहित होण्याकरितां त्यांनीं ज्या ज्या सूचना केल्या त्या मी शक्य तितक्या अमलांत आणण्यात कसूर केली नाहीं. त्यांचा व माझा ऋणानुबंध जुळला नसता तर छे! कशाला—जुळला ह्मणूनच तर रा. फडणीसांचा व माझा परिचय दृढ झाला.

उपर्युक्त दोघेहि सन्मित्र--या माझ्या कृतीचे प्रेरक व प्रोत्साहक श्री. गोळेगांवकर व श्री. अनंततनय दुर्दैवानें दिवंगत झाल्यामुळें ही कृति मूर्त-स्वरूपांत आलेली त्यांच्या पाहण्यांत येऊं शकली नाहीं. त्यांच्या विषयींची कृतज्ञता केवळ अंतःकरणानेंच मानणें भाग आहे.

श्री. फडणीसांनीं स्वकर्तव्यास अनुसरणाऱ्या त्यांच्या अंगच्या स्वाभाविक गुणामुळें माझ्या नम्र विनंतीचा स्वीकार केला. काव्यरत्नावलींतून ही महाराष्ट्र गीतांजलि क्रमशः प्रसिद्ध करून जनतेपुढें आणण्यांत त्यांनीं जें औदार्य प्रगट केलें त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. विशेषतः त्यांचे चि. श्री. **वासुदेवराव फडणीस** यांनीं येत्या महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाच्या अधिवेशनापूर्वीं प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कामीं इतर महत्वाचीं कामें बाजूस सारून जीवाभावानें प्रयत्न केला, याबद्दल त्यांचे उपकार मी जन्मभर विसरणार नाहीं. कर्तव्यबुद्धीनें वागणारीं अशीं माणसें विरळच असतात. तसेंच प्रस्तुत पुस्तकास प्रस्तावना लिहून देऊन पूर्वपरिचय नसतांहि केवळ माझ्या

कृतीचें ज्यांनीं कोड कौतुक केलें व ती कृती जनतेच्या आदरास पात्र होण्यास साह्य करून कायमचें ऋणी केलें; असे श्री. **रामचंद्र गोविंद कानडे** ( वाङ्मयविशारद ) यांचे व त्यांचा परिचय करून देणारे माझे गुणग्राही सन्मित्र श्री. **नारायण महादेव भिडे** बी. ए. [भोर] या उभयतांचे आभार मानण्यास मजजवळ शब्द नाहींत.

शेवटीं महाराष्ट्रीय रसिकांना माझी नम्र विनंती आहे कीं, गीतांजलीचें रहस्य आजपर्यंत बऱ्याच विद्वानांनीं गद्यपद्यरूपानें आपणापुढें व्यक्त केलें आहे. त्यांच्या बरोबरीला बसण्याची माझी प्राज्ञा नाहीं; तथापि वरील सज्जनांच्या प्रेरणेनें, प्रोत्साहनानें व पुरस्कारानें 'स्वांत:सुखाय' मी हें धाष्टर्य केलें आहे. **गीतांजलि** ही माझ्या मतें वाटते तितकी गूढ नाहीं व समजते तितकी सोपी नाहीं अशा दृष्टीनें मी तिचें रूपांतर केलें आहे. हंसक्षीरन्यायानें आपण तिचें कोडकौतुक कराल अशी मला पूर्ण आशा आहे. पुष्पांचा परिमळ पसरविण्यांत पऱ्यांचा जितका उपयोग तितकी जरी माझी सेवा जनता–जनार्दनास मान्य झाली तरी मी स्वतःस धन्य समजेन.

नांदेड, वैशाख शु॥ १
शके १८५३

आपला नम्र
**दे. ल. महाजन**

—×—

# महाराष्ट्र-गीतांजलि

[ साकीवृत्त ]

अमर कराया मला मोद तुज, अपक्व घट रिचवूनी,
पुनः पुन्हां तो भरुनि काढिसी जीवन नव घालून. १
करीं घेउनी लहानशी ही वेणू तूं वाजविसी,
मधुर तिच्यांतुनि सूर काढुनी तूं गिरिकंदरिं फिरसी. २
परमानंदीं मग्न हृदय हें स्पर्श तुझा होऊन,
अवर्ण्य ऐसे धन्योद्गारहि निघती त्यापासून. ३
अनंत हस्तें तुझ्या देणग्या देसी, गणति न ज्यांसी,
लहानशा या दोन करांनीं ध्यावें लागे त्यांसी. ४
युगीं युगीं तूं करिसी देवा ! यापरि तद्वर्षाव,
अपूर्ण होते भरती, त्यांचा लागे ना मज ठाव. ५

२

गावें मीं नव गीत ह्मणुनि तूं आज्ञा करिसी जेव्हां,
त्यायोगें अभिमान वाटतो फारच मजला तेव्हां. ६
पाहीं मी मुखचंद्र तुझा तो देवा ! निजनेत्रांनीं,
तेव्हां येती भरून तेही अत्यानंदाश्रूंनीं. ७
असे विसंगति, कठोरपण जें भरलें माझ्या अंगीं,
[illegible]रूपांतर होउनि उरतें माधुर्याचि त्या जागीं. ८
प्रेमभक्तिचे पंख लावुनी धांव तुजकडे घेतों,
सागर ओलांडून जसा खग मोदें उडताचि जातो. ९

‘ माझ्या गीतें मोद होय तुज ’ आहें मी जाणून,
येतो देवा ! तुझ्यापुढें मी प्रियकर भक्त ह्मणून. १०
पंख पसरुनी गानाचे पद–कमला स्पर्शूं पाहीं,
त्याविण तेथें पोंचायाची लवही आशा नाहीं. ११
जगदीशा ! मी जेव्हां जातों त्वत्भजनीं रंगून,
भक्ति–प्रेमें आनंदांतचि मग्न तसा होऊन. १२
‘ कोण असें मी ’ पूर्णपणें हें जातों तैं विसरून,
धनी असुनि तूं सलगी करितों तुजला ‘ मित्र ’ ह्मणून १३

३

गातो कैसा न कळे परि मी गुंग विस्मयें होई,
नाद--ब्रह्में जगत्प्रकाशें, नभ दुमदुमुनी जाई. १४
प्रवाह जो का पवित्र देवा ! तुझ्या मधुर गीताचा,
वाहे करुनी निरास पर्वततुल्य अशा विघ्नांचा. १५
तुजसह गावें ह्मणुनी माझें उत्कंठित मन होतें,
काय करावें परंतु न निघे शब्दचि तोंडावाटे. १६
बोलूं जातां बोल न पडती कंठांतुनि बाहेर,
त्यायोगानें हताश होउनि रडतों मी अनिवार. १७
अखंड त्या निज संगीताच्या मोहमयी पाशानें,
निबद्ध करुनी मला ठेविलें जगदीशा ! सुखदानें ! १८

४

पवित्र तैसा सजीव व्हावा स्पर्श तुझा गात्रांस,
यास्तव मी ठेवीन सदोदित निर्मळ निजदेहास. १९

असत्य जे जे विचार त्यांना घालवूनि द्यायाचा,
मनांतुनी हा यत्न निरंतर करीन मी नेटाचा. २०
प्रज्ञेचा जो पाडणार गा ! प्रकाश माझ्यावरतीं,
तो तूं अससी सत्यरूप ही गोष्ट जाणतों पुरती. २१
हृदयांतिल ही दुष्ट जागती घालवून देईन,
भक्तिरूप हें सुमन विकासित संतत मी ठेवीन. २२
कारण माझ्या हृदय–मंदिरीं आंतिल गाभाऱ्यांत--
वास तुझा ईश्वरा ! सर्वदा आहे मजला ज्ञात. २३
रूप तुझें तें प्रतिकर्मांतुनि व्हावें मजला व्यक्त,
या विषयीं मी करीन देवा ! प्रयत्न तो अतिरिक्त. २४
कारण जें सामर्थ्य लागतें प्रतिकर्मालागून,
तुझ्याच सत्तेमुळें मिळे तें आहें मी जाणून. २५

५

मत्कर्तव्यें तडीस नेसी, तत्पूर्वीं जगदीशा !
क्षणभर तव सहवास घडावा पूर्ण करीं ही आशा. २६
त्वत्दर्शन तें दुरावलें जरि, समाधान--विश्रांति.
माझ्या अंतःकरणीं नाहीं घडेल कैशी प्राप्ति ? २७
तेणें निजकर्तव्य जीवना ! अखंड मजला भासे,
अंतपार ज्या नसे, कष्टमय अशा सागराऐसें. २८
बघुनि वसंतागमन आज त्या सर्व ऋतूंच्या ईशा,
करिती वातायनामधूनी ‘ गूं गूं ’ या मधमाशा. २९

उद्यानांतिल भिन्न फुलांच्या सहज ताटव्यावरतीं,
मधुर मधूतें सांठवावया इकडुनि तिकडे फिरती. ३०
ध्यान कराया सन्मुख बसुनी, द्याया तनुची खोळ,
शांतिपूर्ण अति रिकामपणची योग्य असे ही वेळ. ३१

६

तोडुनि घे हें पुष्प चिमुकलें विलंब न करीं आतां,
भीति वाटते धुळींत पडुनी कोमेजुनि तें जातां. ३२
नाहीं मग मिळणार गळ्यांतिल हाराची त्या जोड,
करिं हस्ताचा स्पर्श असुखसा, सन्मानुनि परि तोड. ३३
भीति वाटते, न कळत मजला जाइल दिन मावळुनी,
पुष्प तुला तें अर्पायाचा समयहि तैसा टळुनी. ३४
त्या पुष्पाचा रंग न गहिरा, गंधहि थोडा त्यास,
वेळ असे तोंवरिच तोड तें, लाव तुझ्या सेवेस. ३५

७

अलंकार ते काढुनि झालें साधें माझें गीत,
वस्त्रभूषणें यांचा नाहीं थाटमाट त्याच्यांत. ३६
तदात्मता जातांच, विघ्न मग उभयीं तें येईल,
त्याचा ध्वनि तव मंद मधुरशा ध्वनिस लया नेईल. ३७
काव्याचा अभिमान तुजपुढें लाजें जाय गळून,
ह्मणुनि राहिलों अगा कवींद्रा ! त्वत्पद कवटाळून. ३८
शुद्ध सरळसें जीवित माझें मजसि करूं दे तूर्ण,
होइल तेणें मुरलीसम तव मधुर सुरांनीं पूर्ण. ३९

८

ज्या बालाच्या देहावरतीं राजवस्त्र–संभार,
गळ्याभोंवतीं रत्नजडितशा शृंखलाहि त्या फार. ४०
कोठुनि त्याला क्रीडेमाजी आनंदाची जोड,
वेष तयाचा पदोपदींही खेळामधिं ये आड. ४१
जगापासुनी दूर ठेवितो, भीति चलनवलनाची,
जळेल किंवा मळेल धूळिंत हीच कल्पना ज्याची. ४२
माते! तूं जे त्यास घातलें अलंकार श्रृंगार,
आरोग्यप्रद धूलिकणां तें तेणें अंतरणार. ४३
प्रपंचरूपी महोत्सवाचा मिळे न त्या जरि भोग,
श्रृंगाराचा, आभरणाचा काय बरें उपयोग? ४४

९

स्वस्कंधावरि बसुनीया तूं मूर्खा! यत्नें जाशी,
भीक मागसी काय भिकाऱ्या! आपुल्याच दाराशीं. ४५
भार सोशितां समर्थ जो, त्या हातीं दे हीं ओझीं,
दुःखानें बघुं नकोस मागें, गोष्ट ऐक तूं माझी. ४६
तृष्णा तव करि ज्या दीपातें स्पर्श निजश्वासानें,
मालवुनी तत्प्रकाश तत्क्षणिं त्यातें ती विलया ने, ४७
घेउं नको तूं देणग्याहि जरि देइल अपवित्रा ती[1]
प्रेम पवित्रचि जें जें देइल तेवढेंच घे हातीं ४८

१ तृष्णा

१०

हें येथें वास्तव्य तुझें श्री जगदीशा ! स्वयमेव,
जिथें पातकी, हीन, दीन जन, तिथेंच तूं पद ठेव ४९
जेव्हां मीं तुजपुढें वांकुनी यत्न करीं नमनाचा,
ऐक ईश्वरा ! काय होतसे तेव्हां शेवट त्याचा ५०
जिथें पातकी, हीन, दीन जन, तुझीं पाउलें जेथें
साष्टांग प्रणिपात तुला तो पावे ना परि तेथें. ५१
करुनीया तूं वेष भिकारी नांदसि या लोकांत,
अभिमानाचा प्रवेश कधिंही होणें नाहीं त्यांत. ५२
अशा जनीं जे अनाथ त्यांना सनाथ करिसी जो तूं ,
माझ्या हृदयीं प्राप्ति तुझी नच होइल, यांत न किंतु. ५३

११

माळेचा जप, भजन, गान दे सोडुनि नांवहि यांचें
देवद्वारें लावुनि करिसी ध्यान तरी कोणाचें ? ५४
पहा उघडुनी नेत्र तुला मग कळेल सगळें कांहीं
ध्यान करिसि तूं ज्याचें तो प्रभु तुझ्याच संन्निध नाहीं ५५
कठोर भूमी नांगरितो निज शेतकरी जेथून,
तेथें आहे देव तुझा तो जीवा ! जा येथून ५६
मजूर तो बघ रस्त्यासाठीं खडी फोडितो जेथें,
देव पहाया जीवा ! सत्वर ऊठ ऊठ जा तेथें. ५७
उन्हांत तैसा पावसांत तो असे सदा त्यांच्यांत,
मळलीं वस्त्रें त्याचीही बघ त्यांसह धूलिकणांत. ५८

धूळीनें भरलेल्या भूवरि उभा रहा दिनयाम,
उंचीचा हा वेष टाकुनी तूंहि तिथें करि काम. ५९
निर्माया ही सृष्टि मानवा ! सहजाचि आनंदानें,
स्वयें वाहुनी असें घेतलें आपणास देवानें. ६०
जन्ममृत्युच्या चक्रीं घाली गिरक्या तो प्रत्यक्ष,
तुलाच जीवा प्राप्त होय मग कसा कोठुनी मोक्ष ? ६१
मळून गेलीं वस्त्रें किंवा फाटुनि गेलीं सारीं,
हानि कोणती ? ध्यान धारणा सोडुनि ये बाहेरीं. ६२
धूप फुलें हीं दूर सार जा सत्वर त्याला भेट,
घाम गळेतों कष्ट करी त्या संगें धरुनी नेट. ६३

## १२

प्रवास माझा चालू राहिल दीर्घ कालपर्यंत,
मुक्कामाला पोंचायांचा दूर असे तो पंथ. ६४
प्रथम प्रकाश--किरणांचा रथ करुनि त्यामधें बसलों,
बहि:प्रदेशीं निघुनि आजला येथवरी मी आलों. ६५
नभःपर्यटन करीत अगणित लंघुनिया ग्रहगोल,
क्रमिला पथ मीं, चिन्हें ठेवुनि, उमटवुनि पाऊल. ६६
तुज भेटाया मार्ग असति जे दूर बिकट बहु जाण,
सुलभ मात्र तो मार्ग एकटा मधुरप्रेमळ गान. ६७
द्वार आपुलें मिळे तोंवरी या पथिंच्या पथिकातें,
ठोठावावें लागे आधीं इतरांच्या द्वारांतें. ६८

बाह्य कितीतरि उंबरठे ते लागति ओलांडावे,
आंतिल गाभाऱ्यांत शेवटीं तेंव्हां मग पोंचावें. ६९

' हा तूं येथें ' नेत्र मिटुनिया मी ह्मणण्यापूर्वींच,
भटकति [1]ते भलत्याच दिशेनें अतिशय दूर उगींच. ७०

" कुठें ? कुठें तूं अससि " अहाहा ! निघतां हा उद्गार,
पालटुनी तद्रूप वाहत्यें जणु अश्रूंची धार. ७१

अश्रूंचे ते ओघ हजारों वाहुं लागले जेंव्हां,
' अहमस्मि '--प्रत्यय--प्रवाहीं विश्व बुडालें तेंव्हां. ७२

१२

आलों जें मी गीत गावया त्याचें गान न केलें,
वाद्याचे हे तंतु लावितां व्यर्थ दिवस हे गेले. ७३

जमहि बसेना, लय लागेना, योजना न शब्दांची,
हृदयीं तळमळ मात्र राहिली ही नसत्या इच्छेची. ७४

उद्यानीं या कळी फुलाची अजुनि उमलली नाहीं,
मात्र भोंवतीं वायु सारखा घोंघावत हा राही. ७५

पाहिला न मुखचंद्र, ऐकिला शब्दहि त्याचा नाहीं,
मंद पाउलें मार्गावरचीं मात्र ऐकिलीं कांहीं. ७६

घालण्यांत हें आसन सारा दिवस निघोनी गेला,
दीप लाविला नाहीं ह्मणुनी न ये आणितां त्याला. ७७

आशा धरुनी आयुष्याचे दिवस कंठितों पाहीं,
अद्यापिहि परि दर्शन त्याचें मजला झालें नाहीं. ७८

---

१ नेत्र

१४

माझ्या इच्छा विपुल, दयेचा पाझर तुजला यावा,
एकसारखा कंठशोष मी ह्मणुनी केला देवा ! ७९
परि अवमानुनि दीन याचना रक्षण माझें केलें,
तुझ्या कृपेनें जीवित भरुनी सफल दिसे झालेलें, ८०
मुळिं न मागतां साध्या, मोठ्या दिल्या देणग्या या तूं,
हें आकाश, प्रकाश, तनु, मन, जीव यांत ना किंतु ८१
अशा देणग्या देउनि करिसी वरचेवर मज पात्र,
तृष्णोद्भव संकटापासुनी रक्षिसि तूं दिनरात्र. ८२
बनुनि आळशी कधिं वेड्यासम भटकत भटकत फिरतों,
ध्येय-शोधनीं जागृत राहुनि तन्मय केंव्हां बनतो. ८३
होउनि निर्दय लपसी परि तूं मजपासुनिया दूर,
माझ्या इच्छा अमान्य करिसी त्यापरि वारंवार. ८४
त्या योगानें पूर्ण कृपेला पात्र मला तूं करिसी,
संदिग्धाशुभ तृष्णोद्भव तीं सर्व संकटें हरिसी. ८५

१५

मी येथें तुजपुढें पातलों तुला गावया गाणें,
तुझ्या मंदिरीं माझें आहे कोपऱ्यांतलें ठाणें. ८६
काम नसे मज, मनिं प्रयोजन, उद्देश न राहिल,
निरुपयुक्त हें जीवित आतां गाण्यांतच जाईल. ८७
मध्यरात्रिंच्या ध्वांत—मंदिरीं शांत वेळ ये जेंव्हां,
'सन्मुख राहुनि उभा करीं मद्भजन' सांग तूं तेंव्हां. ८८

प्रभातकालीं जेव्हां लागे सुवर्ण वीणा छान,
उपासनेस्तव आज्ञापी मज राखुनि माझा मान. ८९

१६

या जगताच्या उत्सवास हें आमंत्रण मज आलें,
त्या योगानें देवा ! माझें कृतार्थ जीवित झालें. ९०
गमे धन्यता, मन्नेत्राचें खचित पारणें फिटलें,
आमंत्रण हें ऐकुनि माझे श्रवण तृप्तिनें धाले. ९१
मद्वाद्याचें काम मजवरी होतें सोपवलेलें,
यथाशक्ति मी पूर्णपणानें मला गमे मी केलें. ९२
करुनि मंदिरीं प्रवेश, घेउनि दर्शन, तव नमनाचा,
समय शेवटीं पातला न का ? प्रश्न तुला दासाचा. ९३

१७

त्या ईशाच्या हातीं प्रेमें अर्पण करूं स्वतांस,
यासाठीं मी वाट पाहतों शेवटच्या समयास, ९४
माझ्याकडचीं कामें राहुनि तशींच गेलीं सारीं,
याचमुळें मज उशीर झाला, अपराध घडे भारी. ९५
बद्ध करावें मला असा हा हेतु धरुनि निजचित्तीं,
बहुत कायदे कानू घेउनि लोक मजकडे येती. ९६
परि मी त्यांना नित्य टाळितों, खंति न मजला त्याची,
वाट पाहतों परि ईशाच्या स्वतांस अर्पायाची. ९७
दोष मला जन देती, ह्मणती, ' चिंता याला नाहीं,
खरा असे हा दोष, यामधें नसेचि शंका कांहीं. ९८

हाटाचा दिन सरुनि, संपलें काम तसें उदम्यांचें,
हांका मारित ते जन गेले, फुकट यत्न ते त्यांचें. ९९
त्या ईशाच्या हातीं प्रेमें अर्पण करूं स्वतांस,
यासाठीं मी वाट पाहतों शेवटच्या समयास. १००

१८

ढगांमागुनी ढग किति येती, वाढतसे अंधार,
एकटाच मज तिष्ठविसी तूं कां दाराबाहेर ? १०१
कामामाजी निमग्न असती जन माध्यान्हीं जेव्हां,
त्यांच्यासंगें करीत कामें मीहि राहतों तेव्हां. १०२
परि ध्वांतमय उदासवाण्या दिवशीं देवा स्वमनीं,
दर्शन व्हावें ह्मणुनि राहिलों केवळ आशा धरुनी १०३
हेळसांड जरि करुनि लोटिसी, दाविसी न वदनास,
न कळे कैसे पर्जन्याचे कंठूं दिवस उदास ! १०४
ध्वांत पसरला दूर चहुंकडे नील अशा आकाशीं,
टक लावुनि मी एकसारखा पाहत राहीं त्यासीं १०५
उसंत नाहीं क्षणहि जया तें रडगाणें वाऱ्याचें,
त्याच्यासंगें मन्मन देवा ! भटकत भटकत नाचे. १०६

१९

बोलसी न तरि भरीन हृदया तुझ्या मौन-भावानें,
राग तुझा तो तसाच साहिन देवा ! शांतपणानें. १०७
करित पहारा तारामय ही निशा नमविते माथा,
निवांत हा मी तुझी पाहतों वाट ईश्वरा ! आतां. १०८

तुझा ध्वनी जैं प्रभात होइल, तम तिळभरि न उरेल,
सुवर्णमय किरणांच्या वृष्टिस करित नभीं पसरेल. १०९
पक्ष्यांच्या वरट्यांतुनि फुटातिल पंख तुझ्या शद्बांस,
राईमधुनी मधुरालापहि येतिल ऐकायास. ११०

२०

ज्या दिनिं फुललें कमल अरेरे ! मन भटकत तैं होतें,
कमल पुष्प तें फुललें, ऐसें नाहीं कळलें मातें. १११
पुष्प-करंडक यापरि माझा रिकामाच तो राही,
कमलाच्या त्या फुलांकडे मम लक्ष्याचि गेलें नाहीं. ११२
स्वप्नांतुनि मी जागा झालों, मन असतांच उदास,
दाक्षिणानिलीं अपूर्व ऐसा आला मधुर सुवास. ११३
सुवास येतां उत्कंठेनें व्याकुल झालें चित्त,
उत्कंठित ये ऊष्ण वायु तो गमे आत्मतृप्त्यर्थ. ११४
समीर आला, किंबहुना तो माझा ऐसें झालें,
हृदयीं तन्माधुर्य विकसलें; मनीं न परि हें आलें, ११५

२१

माझी होडी मला ढकलली पाहिजेच पाण्यांत,
काळ किनाऱ्यावरिच चालला हे ! हे ! आलस्यांत. ११६
हतभागी मी असे केवढा ! अंत न दुर्भाग्याला,
वसंत आला, पुष्पसंपदा देउनि परतुनि गेला. ११७
निरुपयुक्त या शुष्क फुलांचें ओझें धरुनि करांत,
वेड्यापरि मी उगाच बसलों येथें वाट पहात. ११८

विस्तृत या छायेच्या राइंत पानें हीं पिकलेलीं,
फडफड करुनी गळून पडलीं सरित्तटाकीं खालीं. १११९
जल-लहरी या करुनि गर्जना मोठ्यानें आदळती,
कुणास बघसी टक लावुनि तूं शून्याकाशीं वरती. १२०
पैल तटाहुनि त्या वायूच्या प्रवाहसंगें दूर,
ऐकिलेंस का वाहत येती गाण्याचे ते सूर. १२१
हवेंत झाला पहा पहा तो आरंभहि कंपाला,
अद्यापी नच कां वद जीवा! अनुभविसी तूं त्याला १२२

## २२

आषाढांतिल पर्जन्याच्या तमोयुक्त मासांत,
शांत रात्रिच्या समयीं त्यापरि दाट अशा छायेंत- १२३
द्वाररक्षका टाळुन लागुं न देतां त्या चाहूल,
हळूंच जासी चोरुनि तूं, नच वाजवितां पाऊल. १२४
उषःकाल हा डोळे मिटुनी आज राहिला आहे,
पूर्वदिशेला शीतल वायू सोसाट्यानें वाहे. १२५
उषःकाल तो परंतु पाही ढुंकुनिही नच त्यासी,
दाट पटल हें दिसें टाकलें जागृत नीळाकाशीं. १२६
तरुराजींतिल गाणें या क्षणि बंद जाहलें सारें,
लागुनि गेलीं तशींच आतां सर्व गृहांचीं दारें. १२७
निर्जनशा या पथीं एकटा वावरसी तूं मात्र,
मज्जीवाचा प्रभो! एक तूं अससी प्रेमळ मित्र. १२८

मात्र ठेविलें द्वार मीच मम सदनाचें उघडून,
स्वप्नासरिसा नकोस जाऊं न कळत तूं त्यावरुन, १२९

२३

नभ नैराश्यें विवळे रात्रीं वादळ पडलें असतां,
भक्ति-प्रेरित बनुनि कुणाच्या फिरसी भेटीकरितां. १३०
हे प्रिय मित्रा ! आज मला ती झोंप सुखाची नाहीं.
अंधारीं मी पुनः पुन्हां तुज दार उघडुनी पाहीं. १३१
परंतु कांहीं न दिसे मजला आश्चर्य मनीं वाटे,
कीं देवा ! तूं चालत असती तरी कोणत्या वाटे ? १३२
कृष्णवर्णशा सरित्तटाकीं ? कीं भीषण कांतारीं,
तमःपथांतुनि येउं लागली तुझी मजकडे स्वारी. १३३

२४

दिन गेला अस्तास, थांबलें पक्षी गाणें गातां,
होउनि वायु श्रांत पडे हा येथ सुखानें आतां. १३४
संध्यासमयीं म्लान अशीं हीं कमलदलें ममतेनें,
ज्यापरि तूं मिटवून टाकिलीं देवा ! निजहस्तानें १३५
जसें घातलें पृथ्वीवरती निद्रेचें पांघरुण,
तसें तमाचें दाट पटल दे सोडुनि माझ्यावरुन. १३६
पूर्ण अन्न-सामग्री ज्याची आधिंच गेली सरुनी,
तशीं फाटलीं पांघरुणें तीं मार्ग-धूलिनें मळुनी. १३७
मार्ग क्रमितां चालुनि चालुनि थकला असा प्रवासी,
दूर करीं तूं देवा ! त्याच्या लज्जा-दारिद्र्यासी. १३८

जसें निशेच्या आवरणीं तें सुमन प्रफुल्ल होई,
पथिकाला या तसें ईश्वरा ! तेज नवें तू देई. १३९

२५

संसाराच्या तापें शिणलों असतां मी अत्यंत,
भार तुझ्यावरि टाकुनि सहजचि निद्रा लागो शांत. १४०
जीवात्मा हतवीर्य होय तंव त्यास वृथा हट्टानें,
उपासनेस्तव सिद्ध कराया यत्न न हो माझ्यानें. १४१
दिवसां करुनी कामें, होतां श्रांत तया नेत्रांसीं,
रात्रीचें तूं पटल सोडुनी पुनरपि जागृत करिसी. १४२
प्रमुदित करुनी नवजीवन तें दृष्टीला देतोस,
चमत्कार हा सर्व ईश्वरा ! तूंच एक करितोस ! १४३

२६

तो प्रभु आला; सन्निध बसला; झालों नाहीं जागा,
चांडाळिण ती निद्रा घेरी तेंव्हां मज हतभागा १४४
होती तेंव्हां शांत निशा ती, वीणा त्याच्या हातीं,
मत्स्वप्नें तत्प्रतिध्वनींनीं भरुनी गेलीं होतीं. १४५
स्पर्श पावते यद्वदनाच्या श्वासाचा निद्रा ती,
कां मुकतों तद्दर्शनास मी ? व्यर्थ निशा ह्या जाती. १४६
प्रकाश आहे कुठें ? तसा तो सांग दिसेल कशानें ?
करी प्रकाशित जीवा ! त्यातें उज्ज्वल इच्छाग्नीनें. १४७
दीप असे परि तज्ज्योतीची फुरफुर कधींहि दिसे न,
दैवच फुटकें हृदया ! याहुनि बरें वाटतें मरण. १४८

विपत्ति ती बघ धक्के देत्ये येऊनिया दाराला,
हळूंच वदत्यें निरोप पुढला मजला सांगायाला. १४९
" असे तुझा प्रभु जागृत, तुजला अंधाऱ्या रात्रींत.
प्रेम- समागम--संकल्पाच्या स्थानीं बोलावीत " १५०
मेघयुक्त नभ, धार लागली संतत पर्जन्याची,
अर्थबोध नच होई पाहुनि खळबळ मच्चित्ताची, १५१
क्षणांत चमके वीज, पुन्हां ती क्षणांत विनिष्ट होते,
त्या योगानें दृष्टिआड घनपटल तमोमय येतें. १५२
रात्रीचा ध्वनि मधुर पहा ज्या स्थानावरुनी येतो,
पथाकडे त्या माझा आत्मा ठेंचा खातच जातो. १५३
प्रकाश आहे कुठे ? कुठें तो दीप दिसेल कशानें ?
प्रकाश त्याचा उज्ज्वलित करी ज्वलित वासनाग्नीनें १५४
नभीं गर्जती मेघ, शून्यशा प्रांतीं वारा वाही,
कृष्णाश्मापरि अंधारानें काळीकुट्ट निशा ही, १५५
निघून जाती असंख्य घटका या अंधाऱ्या मार्गीं,
भक्ति--दीप तूं जीवन तैलें करीं प्रकाशित वेगीं. १५६

## २८

संसाराचे पाश सुदृढ परि तोडुनि तो टाकाया,
प्रयत्न करितां हृदय तळमळे माझें कां वद राया ! १५७
मला पाहिजे काय ? ईश्वरा ? केवळ ती तव मुक्ति,
परंतु आशा करितां तीची लज्जा वाटे चित्तीं, १५८

अपार भरलें धन तुजपाशीं याची मजला खात्री,
यांत न शंका, तशीच आहे तुझी मजसवें मैत्री. १५९
परि माझ्या या खोलिंत भरला फार बेगडी कचरा,
धैर्य मला नच फेंकायाचें झाडुनिया तो सारा. १६०
देहाची ही खोळ मृत्तिकामय जाइल घासून,
तिला निंदितों, तरी राहिलों प्रेमानें बिलगून. १६१
प्रयत्न झाले निष्फळ, माथां थोर ऋणांचीं ओझीं,
लज्जास्पद त्यापरी गुप्त तीं अघोर कृत्यें माझीं. १६२
तथापि जेव्हां तुला प्रार्थितों भीतच कल्याणार्थ,
मला वाटतें कीं ही होइल याचनाच रे! व्यर्थ. १६३

२९

मन्नामासह ज्यास कोंडिलें, तो रडतो कारांत,
निमग्न माझ्यासभोंवतीं मी बांधण्यांत ही भिंत. १६४
दिसों लागते नभास जों जों या भिंतीची उंची,
तिच्या तमच्छायेनें ओळख पटे न मद्रूपाची. १६५
मज वाटे अभिमान हिचा; नच उरो छिद्र मन्नावीं,
करुनि गिलावा मृत्सिकतेचा ह्मणुनि तिला मी लावीं. १६६
जों जों करितों अशी कृती मी कष्टुनि जीवापाड
तों तों माझें खरें रूप तें होय दृष्टिच्या आड. १६७

३०

एकटाच जगीं आलों, परि या शांत तमोमय पंथीं,
करित्ये माझा पाठलाग ज़ी, कोण असे ती व्यक्ति? १६८

टाळायाचा प्रयत्न करितों, परि कसली ती सुटते ?
गर्वभरानें चालत वरती धूळ मात्र उडवीते. १६९

उच्चारावा मी स्वमुखानें जेव्हां जो जो शब्द,
उच्चस्वर तैं काढुनि करितों त्याचा तो अनुवाद १७०

सूक्ष्मस्वरूप माझें तें जरि माझ्या पाठिस लागे,
लाज वाटते परि तव दारीं यावयास त्यासंगें. १७१

३१

विचारिलें मीं बंदीवाना बद्ध तुला कुणि केलें ?
'केलें मज माझ्याच धन्यानें,' उत्तर त्यानें दिधलें १७२

त्याचें उत्तर ऐकुनि गमलें तेव्हां मच्चित्तास,
सत्ता–संपत्तीनें मागें हटविन मी सर्वांस. १७३
राजाचें धन मीच आपुल्या भांडारीं सांठविलें,
निद्रा येतां तत्शय्येवरि जाउनि शयनहि केलें. १७४
हळुंच पाहिलें उठुनि सभोंवतिं जेव्हां जागा झालों,
माझ्या त्या भांडारगृहीं मी निबद्ध होउनि पडलों. १७५
"अभेद्य ऐशी कुणीं घडविली तुझी श्रृंखला पदिंची ?"
पुसतां, वदला; "केली कष्टें स्वयें घडण मी तीची."१७६
मला वाटलें; अजिंक्य माझी शक्ति न पावे पतन,
बद्ध करिन मी जगास साऱ्या, ठेविन त्या स्वाधीन. १७७
मीच तेवढा स्वतंत्र राहिन, सांगुं आणखी काय ?
अशी श्रृंखला मींच घडविली करुनी बहुत उपाय. १७८

अग्नीचा संस्कार देउनी, ठोकुनि तिला घणानें,
तिचा दुवा प्रत्येक बनविला वज्रापरि कष्टानें. १७९
अशी श्रृंखला पुरी जाहली; तोंच अरेरे! काय ?
कळलें मज माझेच अडकले तिच्यांत दोन्ही पाय.! १८०

३२

मजवरि करिती प्रेम लोक ते, बद्ध करिति मज वाटे,
अनंत पटिनें प्रेम तुझें तें त्यांच्यापेक्षां मोठें. १८१
त्वत्प्रेमाची गोष्टच अगदीं आहे तद्व्यतिरिक्त,
स्वप्रेमें तूं बद्ध न करितां संतत ठेविसि मुक्त. १८२
पडेल त्यांचा विसर ह्मणुनि ते त्यजिति न मजला कधिंही,
दिवस चालले झरझर परि तव दर्शन घडलें नाहीं. १८३
भजनीं तुज नच आळविलें; नच सांठविलें हृदयांत,
प्रेम तुझें परि मत्प्रेमाची बसते वाट पहात. १८४

३३

दिवसां ढवळ्या घरांत शिरले; ' स्थळ थोडें द्या ' वदले,
आश्वासुनि मज, दीनापरि तें कोपऱ्यांत तैं बसले. १८५
' देव–पुजेला साह्य करूं तव, मिळतां अंश कृपेचा–
करूं पहा स्वीकाराचि आह्मी नम्रपणानें त्याचा. १८६
रात्रींचा परि समय पातला होउनिया सूर्यास्त,
तंव ते घुसले देवघराच्या पवित्र गाभाऱ्यांत. १८७
तिथें तयांनीं माजवुनि दिली मग भारी बंडाळी,
द्रव्यें केलीं देवार्पण तीं सारीं लुटुनी नेलीं. १८८

३४

'माझें तूं सर्वस्व,' भावना देइल जी हें ज्ञान,
माझ्या हृदयीं तीच तेवढी होवो ! स्थानापन्न. १८९
जळीं स्थळीं पाषाणीं काष्ठीं अससी तूं ! सर्वत्र,
प्रति कर्मानें होइन मी तव निकट यावया पात्र. १९०
प्रतिक्षणीं मत्प्रेम करावें अर्पण तुज जगदीशा !
राहो ! ही अवशिष्ट एवढी माझ्या चित्तीं आशा. १९१
ज्यायोगें तुज लपविन नच मी, एवढीच मति होवो.
बद्ध करिल मज तव इच्छेशीं पाश तेवढा राहो ! १९२
जेणें घडतिल माझीं कर्मे धरुनि तुझ्या इच्छेस,
राहो तो अवशिष्ट तेवढा त्वत्प्रेमाचा पाश ! १९३

३५

हे परमात्मन् ! जेथें न शिवे भीति मनाला कांहीं,
डोळे करुनी वर चालाया शंका वाटत नाहीं, १९४
जेथें असती मार्ग मोकळे ज्ञानाच्या प्राप्तीचे,
संकोचानें तुकडे तुकडे झाले नच जनतेचे. १९५
शुद्ध अशा त्या सत्यावांचुनि शब्द न जेथें वायां,
हात पसरितों उद्यम संतत पूर्णतेस मिळवाया. १९६
मृत रूढीच्या भयाण पुलिनीं पावुनिया लोपाला,
प्रज्ञेचा तो निर्झर निर्मल लुप्तप्राय न झाला. १९७
कृपाप्रेरणा तुझीच कारण ज्या आचारविचारां—
होउनि तद्विस्तार, मनाच्या प्रगतिस मिळतो थारा. १९८

प्रभो! अशा त्या स्वतंत्रतेच्या स्वर्भूमाजीं ताता!,
होवो माझा देश निरंतर जागृत सत्वर आतां १९९

३६

माझ्या हृदयीं दैन्य सदा जें मूळ धरूनी राहे,
घाव घाल तूं त्यावर, माझी अशी प्रार्थना आहे. २००
सुखदुःखें जीं माझीं तीं मीं सहजचि सहन करावीं,
मत्सेवेला प्रेमफलाची प्राप्ती देवा! व्हावी २०१
गरिबांची ती कधीं उपेक्षा मजकडुनी न घडावी,
प्रबलोन्मत्तांपुढतीं माझी मान न कधिं वांकावी. २०२
संसारांतिल व्यापापासुनि वृत्ती दूर रहावी,
असो सदा सामर्थ्य, ह्मणूनी शक्ती मजला द्यावी. २०३
अल्पस्वल्पचि तें तें प्रेमें अर्पिन मत्सामर्थ्य,
अशी मला दे शक्ति ईश्वरा! त्याविण सारें व्यर्थ. २०४

३७

मच्छक्तीची सीमा झाली प्रवास संपुनि गेला,
माझ्या पुढचा मार्ग मला तो रुद्ध दिसे नयनाला २०५
सर्व शिधासामग्री सरली काळ जवळ तो आला.
शांत विविक्त-स्थलीं जाउनी विश्रांती घ्यायाला. २०६
वाटत होतें मला असें-परि अनुभूती आली ही,
मत्कर्माची समाप्ति व्हाया तुझीच इच्छा नाहीं. २०७
जुने शद्ब ते वाणीमधुनी मुळीं न निघती जेव्हां,
हृदयांतुनि नव मधुर स्वर मग सहजच फुटती तेव्हां.

जेथें जेथें जुने मार्ग ते नाहींसे होतात,
प्रदेश नूतन चमत्कारमय येती दृष्टिपथांत. १०९

३८

पाहिजेस तूं ह्मणुनि तळमळो ! अखंड माझा जीव,
संतत करिती व्यग्र मनाला, फोल वासना सर्व. २१०
ध्वांति मिळाया प्रकाश, करितां कंठशोष कुणि भारी,
अर्ज तयाचा रात्र ठेवित्ये लपवुनिया अंधारीं. २११
गाढ अशा मम अज्ञानाच्या गाभाऱ्यांतुनि खोल,
'पाहिजेस तूं एकटाच मज' आर्त निघे हा बोल. २१२
प्रथम शांतता असतां उठतें वादळ एकाएकीं,
परंतु त्याचा हेतु, करावा शोध शांतिचा हा कीं. २१३
तशीच माझी बंडखोर ही वृत्ति होउनी क्षुब्ध;
प्रवृत्त झाली जरी कराया त्वत्प्रेमास विरोध. २१४
एकाएकीं दिसून येतें तिचें असें हें होणें,
'पाहिजेस तूं एकटाच मज' हेंच सदा रडगाणें. २१५

३९

कठोर त्यापरि शुष्क हृदय हें होइल माझें जेव्हां,
दयाघना ! करि कृपाजलाची वृष्टि मजवरी तेव्हां. २१६
वाढुनि हा संसार चित्त मम विटेल तैं त्वां यावें,
गोड अशा त्वत्प्रेमळ भजनीं रंगवुनी सोडावें. २१७
गोंगाटचि सारखा भोंवतीं राहिल जैं माजून,
संसाराचीं कामें करितां जाइल चित्त गढून. २१८

दर्शन तव तें अतींद्रिय असें होइल नच त्यायोगें,
शांतिनाथ ! विश्रांति, शांति ती घेउनि ये निजसंगें. २१९
कृपण, भिकारी हृदय भेदरुनि दडुनि बसे कोन्यांत,
दार फोडुनी थाटानें हो ! प्रविष्ट नृपसम त्यांत. २२०
अगा पावना ! मना वासना मोहग्रस्त करील,
धूळ फेंकुनी नेत्रीं त्याला अंध करुनि टाकील. २२१
तैं जागृत देवांच्या देवा ! मजकरितां ये वेगें,
प्रकाश तैशी मेघगर्जना घेउनिया निजसंगें. २२२

## ४०

हे जगदीशा ! शुष्क हृदयिं या किती तरी दिवसांची,
अनावृष्टि ही ठाणें देतें तव करुणांबुकणांची. २२३
क्षितिज भयंकर शून्य दिसे, नच नांव विरलजलदाचें,
वृष्टि होउनी दूर कुठें नच चिन्ह शीत वायूचें. २२४
या टोंकापासून नभाच्या त्या टोंकापर्यंत,
विद्युद्घोषें दणाणून जें सोडिल सर्व प्रांत. २२५
तुझीच इच्छा असेल तरि मग रुद्ररूपसंपन्न,
मृत्यु, नाश यांसवें प्रचंडाचें वादळ करि उत्पन्न. २२६
सर्वव्यापक, अकरुण, निश्चल, मुग्ध तीव्र यापरिचा,
भीषण नैराश्यानें जाळी हृदया ताप उन्हाचा. २२७
बाप कोपतां दिसे जननीची अश्रुपूर्ण दिनचर्या,
तसा वाहूं दे तव करुणाघन विभो ! षड्गुणैश्वर्या ! २२८

४१

हे नाथा ! या सर्व जनांच्या तूं पाठीमागून,
कोठें अससी उभा राहिला छायेमाजि लपून. २२९

धूळीनें त्या भरल्या मार्गीं जाती ते जवळून,
किंबहुना तुज दूर लोटिती ' नाहींसच समजून. २३०

किती प्रहर मी इथें भटकलों वाट तुझी पाहून,
इथें ठेविली आहे पूजा-सामग्री मांडून. २३१

एक एक जण फुलें घेउनी जाती वाटसरू हे,
पुष्प-करंडक रिता तयानें होत चालला आहे २३२

सकाळच्या परि दुपारची ही निघून गेली वेळ,
झोपेनें हे मिटती डोळे, झाली संध्याकाळ. २३३

जातांना गृहिं जन मज हंसती चित्तीं लज्जित होतों,
बुरखा घेउनि तोंडावरि मी दीनपणानें बसतों. २३४

' काय पाहिजे तुला ? ' ह्मणुनि ते पृच्छा करिती जेव्हां,
अधोवदन मी करुनि, तयांना उत्तर नच दे तेव्हां. २३५

" खराच मी येईन, असें तूं वचन दिलें आहेस—
ह्मणुनि पाहतों वाट " कसें मीं सांगूं तरि हें त्यांस, २३६

' आंदण दिधलें दारिद्र्य मला तूं ' कथितां लज्जा वाटे,
अहंभाव मी हृदयिं अरेरे ! धरुनि ठेविला नेटें. २३७

बसुनि तृणावर नभाकडे मी बघत राहतों नीट,
तव आकस्मिक वैभवशाली आगमनाची वाट. २३८

होउनि जातों दंग ईश्वरा ! अशा मनोराज्यांत,
स्वप्नहि पुढचें सर्व त्या क्षणीं अनुभवितों साक्षात. २३९
दीपोत्सव हा केला आहे जिकडे तिकडे भंवतीं,
सुवर्णमय त्या ध्वजा फडकती तुझ्या रथाच्या वरती. २४०
दीनजनापरि चिंध्या अंगीं, लज्जेनें, अभिमानें,
ऊष्ण काळिंच्या शुष्क लतेसम कंपहि वारिला ज्यानें—
त्या माझा कर धरुनि धुळींतुनि मजला उचलायास,
सिंहासन निज सोडुनि देवा ! खालीं तूं आलास. २४२
पथाभोंवतीं तिष्ठत जे जे येथ उभे असणारे,
चमत्कार हा पाहुनि होती चकित लोक हे सारे. २४३
वाट पाहतां तुझी यापरी वेळ चालला निघुनी,
रथचक्रांचा ध्वनि परि नाहीं ऐकूं आला अजुनी, २४४
नामघोष हे करित, वाजवित टाळ समारंभानें.
किति तरि मेळे, दिंड्या जाती मज पुढुनी थाटानें. २४५
अंधारीं या सर्वांच्याही मागें ठेवुनि पाय,
उभे रहाया गुप्त इच्छिसी एकटाच तूं काय ? २४६
त्याचपरी तव वाट पाहुनी व्यर्थ तळमळे हाय !
एक सारखा अश्रु ढाळितों मीच एकटा काय ? २४७

४२

प्रभातकाळीं गुणगुण आली यापरि माझ्या कानीं,
दोघेही यात्रेस निघालों होडीमध्यें बसुनी. २४८

अमुक हेतुनें जातों, किंवा अमुक अन्य देशाला,
याची वार्ता नसावयाची जगतीं मात्र कुणाला. २४९
ज्याच्यांतुनि निज नौका आतां आहे चालायाची,
सागरास त्या नसे किनारा, कुठे न सीमा त्याची. २५०
गान मधुर मी करीत असतां हास्यवदन होत्साता,
स्वस्थपणें अति शांतपणें तूं ऐकत राहीं आतां. २५१
जलधीच्या त्या लाटा उसळति जशा पहा स्वच्छंद,
स्वच्छंदचि मम गीतें त्यांना शद्बांचा नच बंध. २५२
त्या यात्रेचा अजुनि काय तो आला नसे प्रसंग,
कर्मे करिताचि काय राहणें आहे तोंवरि भाग ! २५३
जलधि–तटाकीं संध्यायोगें ध्वांत हळू हा होय,
त्यायोगानें घरटें गांठी पक्ष्यांचा समुदाय. २५४
सूर्यास्ताच्या शेवटचा हा अंधुक असा प्रकाश,
निशेमधें मिसळून शेवटीं जैसा पावे नाश. २५५
तसेच माझे पाश गळुनिया रात्रीचे अंधारीं,
नौका होइल नष्ट कधीं ही शंका कोण निवारी, २५६

४३

एक असा तो दिन जगदीशा ! आठवतो मम चित्तीं,
तुझ्या स्वागता मुळिंच सिद्धता तेव्हां केली नव्हती.
एकाद्या सामान्य जनापरि न कळत तूं आलास,
मज न सूचना देतां माझ्या हृदयांतरिं शिरलास ! २५८

वाटत होतें आयुष्याचे क्षण जे जाती फुकट,
स्वमान्यतेची मुद्रा त्यांवर ठोकिलीस तूं उलट. २५९
सुखदु:खांच्या पुन:स्मृतीनें धुळीमधें मिसळून,
शुष्क अशा कर्मांत दिवस जे गेले व्यर्थ निघून. २६०
आज त्यांकडे मागें वळुनी सहज दृष्टि मीं दिधली,
त्यां सर्वांवर मुद्रा तव ती असलेली मज दिसली. २६१
बाल्यापासुनि खेळत असतां मातीशीं अज्ञानें !
तूं न पाहिलें कधिंहि मजकडे तिरस्कार मुद्रेनें. २६२
खेळायाच्या खोलीमाजी येतां तव पाऊल,
हळुंच ऐकिली होती तेव्हां ज्याची मी चाहूल. २६३
ताऱ्यां ताऱ्यांमधुनी ऐकूं येतो जो पडसाद,
तीं हीं दोन्ही एक पाउलें; एकच त्यांचा नाद. २६४

४४

छाया जेथें धांवुनि जाते प्रकाश पाहुनि मागें,
तीव्र उन्हाळा संपतांच तो पर्जन्यहि पडुं लागे. २६५
वाट पहावी तुझी बसुनियां अशा सुखाच्या स्थानीं,
हे जगदीशा ! अनुपम मी हा प्रमोद यांतच मानीं. २६६
घेउनिया संदेश दूरचे दूत किती तरि येती,
अभिनंदन मम करिती, मग निज मार्गें निघुनि जाती.
मंद वायुची झुळूक पसरी भोंवति मधुर सुगंध,
मदंतरात्मा सांप्रत भोगी अपरिमेय आनंद, २६८

सूर्योदय तो झाल्यापासुनि सूर्यास्तापर्यंत,
बसून मी राहतों आपुल्या दारापुढतीं येथ. २६९
कारण मजला विदित असे कीं तव दर्शन घडण्याची,
येइल अवचित एकाएकीं वेळ महद्भाग्याची. २७०
परंतु तोंवरि एकटाच या स्थानीं हास्य करीत,
बसुनि राहतों एकटाच मी भजनीं संतत गात. २७१
तुझ्या प्रतिज्ञारूप कृपेच्या प्रसाद-सौगंधें हें—
भोंवतालचें वातावरणहि भरून राहत आहे. २७२

## ४५

येत असे तो पहा आपुले वाजवितां नच पाय,
त्यांचा ध्वनि तो अजुनिहि नाहीं तुह्मी ऐकिला काय!
प्रतियुगिं येतो, प्रतिदिनिं येतो, येतो तो प्रतिरात्रीं,
प्रतिक्षणासी येतो, याची नितांत आहे खात्री. २७४
मच्चित्ताच्या भिन्न भिन्न ज्या असती वृत्ति अनेक,
प्रत्येकींच्या मधुनि गायिलीं गीतें मी बहुतेक. २७५
परि त्या तानासुरांभीतरीं ध्वनि तो एकच वाहे,
'येत असे तो,' 'येत असे तो,' सदैव येतच आहे.
ऊष्ण काळिं मधु पुष्प-गंध तो भरुनि जेधवां राहे,
वनिंच्या पाउलवाटेनें तो सदैव येतच आहे. २७७
निबिड तमोमय रात्रीं बसुनी जलद रथावर जेव्हां,
आषाढीं तो गर्जत येतो 'येतो संतत' तेव्हां. २७८

संसारीं या दुःखामागुनि दुःखें जेव्हां येती,
तच्चरणाची मुद्रा उठत्ये हृत्पटलाच्या वरती. २७९
सुवर्णमय त्या चरणधूलिचा जेव्हां होतो स्पर्श,
प्राप्त होतसे मला तेधवां प्रकाश तैसा हर्ष. २८०

४६

दर्शन द्याया समीप माझ्या हळूंहळूं तूं येसी,
केव्हांपासुनि एकसारखा ? कळे न कांहीं मजसी. २८१
सूर्य तुझा हा हे तव तारे यांना मजपासून,
येणार न कधिं देवा ! तुजला ठेवुनिया लपवून. २८२
सूर्योदय कधिं होतां किंवा कधिं संध्याकाळाला,
तव चरणाचा ध्वनि मम कर्णीं अनेक वेळां आला. २८३
हृदयमंदिरीं माझ्या करुनी प्रवेश कधिं तव दूतें,
कुणास कांहीं न कळत हांका बहुत मारिल्या मातें. २८४
आज उडे ही तारांबळ कां या माझ्या जीवाची,
माझ्या हृदयीं उद्भवली कां वृत्तिहि आनंदाची. २८५
इहलोकींच्या माझ्या साऱ्या अंगीकृत कार्यांस,
संपविण्याची वेळ पातली, असा होतसे भास. २८६
भोंवतालच्या वातावरणीं मधुर तुझ्या सत्तेचा,
सेवितसे मी मंद सुगंधहि, येतो अनुभव याचा. २८७

४७

वाट पाहतां त्याची रात्रहि निघून गेली माझी,
परि तो येइल न कळे अवचित रामपहाऱ्यामाजी. २८८

दमलों ह्मणुनी झोंप लागुनी जरि मी होइन गुंग,
रोधुं नका त्या मन्मित्रांनों ! मुक्त असूं द्या मार्ग. २८९
त्याची चाहुल ऐकुनि जरि मी जागा झालों नाहीं,
मात्र तुह्मी मज उठवायाचे घेउं नका श्रम कांहीं. २९०
उच्छृंखळसा सोसाट्याचा वारा सुटुनी गार,
किंवा होउनि पक्षिगणांचा कलकलाट तो फार. २९१
फुटुनि तांबडें प्रभातकाळीं उत्सव समयामाजी,
व्हावा निद्राभंग अशी ही इच्छा नाहीं माझी. २९२
येउनिया जरि धनी ठाकला अवचित मम दारांत,
तरिही न करा जागा मजला, झोंपूं द्याच निवांत. २९३
झोंप गोड ही वाट पाहत्ये केवळ तत्स्पर्शाची,
स्पर्श तयाचा होता क्षणिं तिज, उडुनी ती जायाची.
मिटलेले हे माझे डोळे माझ्या जगदीशाच्या—
उघडतील कीं प्रकाशयोगें केवळ हास्य-मुखाच्या. २९५
गाढ तंद्रिच्या अंधारांतुनि पडे स्वप्न बाहेर,
तसा उभा असलेला तेव्हां पाहिन त्यास समोर. २९६
रूपाचेंहि आदि रूप जो, प्रकाशांत जो थोर,
दिसोच आदि प्रकाश तो प्रभु माझ्या दृष्टिसमोर. २९७
आनंदाची प्रथम स्फूर्तिही जागृत जीवात्म्याला,
नेत्रकटाक्षापासुनि त्याच्या होवो या समयाला. २९८
माझा जो माझ्याच ठिकाणीं लय जातो होऊन,
तो झणिं त्याच्या रूपीं मजला टाको करुनी लीन. २९९

## ४८

मधुर विहंगम-गीत-वीचि त्या बहु उद्भव पावून,
प्रभातिचा हा शांति-पयोनिधि टाकिति हेलावून. ३००
मुदित, हास्य-मुख हीं तरुपुष्पें येती दिसुनी पूर्ण,
सुवर्ण लक्ष्मी दिसे पसरली ढगांतुनी विस्तीर्ण. ३०१
उद्योगाच्या स्थळीं जावया झालों असतां दक्ष,
निसर्ग शोभेकडे आमचें गेलें नाहीं लक्ष. ३०२
मुळिं न खेळलों अथवा ह्मटलीं गाणीं आनंदाचीं,
गेलों नच खेड्यांत कराया देवघेव वस्तूंची. ३०३
शद्ब न बदलों, हसलों, अथवा रमलों नच मार्गानें,
जों जों जाई वेळ निघुनि तों चाललोंच वेगानें. ३०४
माध्यान्हीं रवि आला, घुमती पारवेहि छायेंत,
सुकलीं पानें नाचत सुटलीं कढत अशा वाऱ्यांत. ३०५
अजापाल हा वटवृक्षाच्या छायेखालीं निजला,
झोंप लागुनी पडूं लागलीं स्वप्नें आतां त्याला. ३०६
श्रांत अशा मम गात्रांलागीं मिळावया विश्रांति,
मीहि पहुडलों जवळ जलाच्या तेंव्हां गवतावरती. ३०७
हंसूं लागले माझे सारे मित्र मला पाहून,
ऐटीनें ते जवळुन गेले माना वरति करून. ३०८
त्यांनीं नुसतें वळून मागें मुळिंच पाहिलें नाहीं,
विश्रांति न ते घेतां गेले; दुरुनि न दिसती कांहीं. ३०९

माळ तशीं मैदानें डोंगर गेले ते उतरून,
प्रवास त्यांनीं केला अगदीं नव्या प्रदेशांतून. २१०
मार्गांतुनिया प्रवासलोभी सर्वहि पांथस्थांनों !
तुह्मी सर्वथा धन्यच ! तुमची शाबासच वीरांनों. २११
मींहि उठावें ह्मणाल तरि मम जीव त्रासुनि गेला,
जननिंदेनें, उपहासानें माझा छळ बहु केला. २१२
छळ झाला जरि यापरि, त्यांना जुमानिलें नच कांहीं,
यत्किंचितही स्थान आपुलें सोडुनि दिधलें नाहीं. २१३
माझ्या त्या गरिबींत राहिलों आनंदाचि मानून,
त्या आनंदीं स्वयें आपणा गेलों मी विसरून. २१४
सूर्याच्या त्या कवडाशानें हरित तरुच्छायेंत,
वेलबुटी जी चित्रविचित्राचि आहे दिसुनी येत. २१५
होतो जो आनंद पाहतां तिला, मिळे जी शांति,
त्यांचा हा परिणाम जाहला अंतःकरणावरती. २१६
करीत होतों प्रवास त्याचा हेतु पुरा विसरून,
गर्द अशा छायेंत गायनीं झालों मी तल्लीन. २१७
जेव्हां सरते शेवटास मम तंद्रा झाली नष्ट,
उघडुनि डोळे पाहतांच मी दिसती मज तूं स्पष्ट. २१८
निद्रित असतां दिसली जैसी हास्य मुखाची मूर्ति,
मूर्तिमंत तूं तसाच असती माझ्या सन्निधवर्ती. २१९
त्वत्प्राप्तीचा मार्ग दूरचा त्रासद कष्टद असला,
यास्तव पडतिल यत्न भगीरथ वाटत होतें मजला. २२०

मला मनीं ही अशी सारखी भीतिच वाटत होती
तुजला बघतां निराधार ती ठरली आतां पुरती. ३२१

४९

कोपऱ्यांत मी बसुनि एकटा होतों भजन करीत,
मद्भजनाचा पडला तेव्हां सूर तुझ्या कानांत. ३२२
निज सिंहासन सोडुनि तत्क्षणिं खालति तूं आलास,
माझ्या दारीं हळूंच येउनि प्रभो! प्रकट झालास! ३२३
हे भगवन् तव मंदिरिं अगणित थोर भक्त जमतात
प्रहर आठही एकसारखें भजन तुझें करितात. ३२४
परंतु देवा! भक्तिपथाचा नवा पाठ मी घेईं,
हें वेडेंवांकडें कसें तरि गान तुझ्यास्तव गाईं. ३२५
करुण स्वर मम भरतें आणी त्वत्प्रेमा हृदयांत,
मिश्र होतसे भजनाच्या ह्या प्रचंड गोंगाटांत. ३२६
पुष्प अर्पिलें मीं जें त्यानें तुष्ट मनीं झालास,
माझ्या दारीं उभा रहाया खालति तूं आलास. ३२७

५०

मागत असतां दारोदारीं मार्गांतुनि भिक्षेस,
सुंदरशा स्वप्नापरि पडला सुवर्ण रथ दृष्टीस. ३२८
पाहतांच मीं चकित होउनि ह्मटलें, ' माझ्या जीवा!
राजांचा हा राजा येथें आला कोण असावा?" ३२९

माझ्या आशा वाढत गेल्या; गमलें मच्चित्तास
आतां माझ्या आयुष्याचे दुर्दिन सरले खास ३३०
भिक्षा मज मिळणार यापुढें पसरितां न निज हात,
उगा राहिलों उगाच येथें म्हणुनी वाट पहात. ३३१
किंबहुना हें पाहुनि गमलें ऐसें माझ्या चित्तीं,
धुळींत गेली पसरुनि ती मज होय लब्ध संपत्ति. ३३२
मत्सान्निध रथ तुझा थांबला; दृष्टि मजकडे वळली,
हास्य करित निज रथामधोनी उतरलास तूं खालीं. ३३३
मला वाटलें दिला शेवटीं कर माझ्या दैवानें,
परि तें ठरुनी फोल, पाहिलें काय पुढें दृष्टीनें. ३३४
करुनी उजवा हात मजपुढें बोललास तूं वेगीं,
'द्याया मजला योग्य असे तें भक्ता! दे मजलागीं' ३३५
भूपांचा तूं भूप मागतां दरिद्यास मज दान,
चकितच झालों असा तुझा हा राजविनोद बघून. ३३६
गोंधळुनीया मूढमतीनें उभा राहुनी तुजला,
झोळींतुनि मी एक सान तो दाणा काढुनि दिधला. ३३७
भिक्षा मागुनि परत घराला येतां सायंकाळीं,
निल्या परि मी करीं रिकामी तदा आपली झोळी. ३३८
तेव्हां बघतां त्या राण्यांच्या भिकारड्या राशींत,
आश्चर्याची गोष्ट केवढी आली दृष्टि-पथांत. ३३९
दिधला होता तुज मी दाणा दिवसा जो बारीक,

सांपडला मज तेवढाच तो सोन्याचा कण एक. ३४०
खळखळ रडलों मला वाटलें, 'केवळ मी हतभागे
सर्वस्वचि तें द्याया झाली बुद्धी न कशी मजलागीं'? ३४१

५१

पडूं लागला वरचेवर हा रात्रीचा काळोख
दिवसाचीं तीं संपुनि गेलीं सर्वहि कामें चोख. ३४२
पहा पाहुणा रात्रीचा तो येइल मुक्कामासीं,
असें वाटतां आह्मां झाल्या बंद गांवच्या वेशी. ३४३
'स्वारी ती येणार नृपाची,' वदले जन परि कांहीं,
आह्मी हंसून ह्मटलें, 'ऐसे कधींच होणें नाहीं' ३४४
भास जाहला तदा मारिली कुणि दारावर थाप,
आह्मी ह्मटलें, 'वारा आला असेल आपोआप' ३४५
दीप मालवुनि निद्रा घ्याया शय्येवरि पडतांच
'दूत पातला' वदले कुणि, त्या उत्तर दिधलें तेंच. ३४६
ऐकूं आला आह्मां ध्वनि जो एक मध्यरात्रीला,
झोंपेच्या गुंगींत दूरचा 'मेघनाद तो गमला' ३४७
धरणी हलली; हलूं लागल्या भिंती त्या समयाला,
त्या योगानें त्रास सारखा झोंपूं जातां झाला. ३४८
कोणी वदले 'पुनरपि आला ध्वनि हा रथचक्रांचा'
तसेंच आह्मी पुटपुटलों, 'हा गडगडाट मेघांचा' ३४९
बरीच होती रात्र, पातला तुतारिचा तैं नाद,

तेव्हां कानीं तिच्यामधोनी आले पुढचे शब्द:— ३५०
" उठा उठा हो लवकर आतां न करा मुळींच उशीर"
ऐकतांच तें अंत:करणीं धडकी भरली फार. ३५१
राजाचें हें पडूं लागलें निशाण दृष्टिस आतां,
वदलों सत्वरि उठुनी, ' नाहीं वेळ विलंबाकरितां' ३५२
"राजा आला, परंतु येथें सिंहासनदीपाचा,
ठावठिकाणा नाहीं अजुनी तैसा हारतुऱ्यांचा. ३५३
मंदिर त्याचें अजुनी नाहीं श्रृंगारित केलेलें
किती असे हें लाजिरवाणें;" कुणी तेधवां बोले. ३५४
"बोल वृथा हे तुह्मी नृपाला रिक्त--करें भेटावें
जिथें नसे श्रृंगार अशा त्या रिक्त मंदिरीं न्यावें. ३५५
दारें उघडा शंखहि फुंका ऐन मध्यरात्रीला,
उदासवाण्या भयाण ऐशा घरांत राजा आला." ३५६
मेघांचा गडगडाट मोठा चाले आकाशांत
मधुनि चमकती विजा पहा त्या काळ्याकुट्ट तमांत. ३५७
रुद्ररूप हा राजा अवचित वादळासवें आला
पसरा अंगाणिं सत्वरि तुमच्या तुटक्याशा चटईला. ३५८

५२

हार गुलाबी पुष्पांचा तव मागुनि घ्यावा ऐसें
होतें माझ्या मनांत परि तें मज न करवलें तैसें. ३५९
तूं गेल्यावर फुलें पाकळ्या कांहीं तव शय्येत,

मिळतिल ह्मणुनी वाट पाहिली उषःकालपर्यंत. ३६०
प्रभातकालीं भिकाऱ्यापरी शयनीं शोधूं जातां
एक दोन पाकळ्या लागल्या तेव्हां माझ्या हातां ३६१
हाय! त्यांत परि काय मिळालें मजला त्या समयास
स्वप्रेमाचें द्योतक ठेउनि काय तरी गेलास? ३६२

गंधोदक सुम, गंध न कांहीं, खड्ग मात्र आढळलें
अग्नितुल्य जें चमके, पविसम अभेद्य जें असलेलें. ३६३
खिडकींतुनि रवि-किरण कोंवळें शय्येवरतीं पडले,
प्रभातसमयीं गीत गाउनी काय विहंगम बोले— ३६४
"गंधोदक सुम गंध धूपही या सर्वांची वाण,
काय असे तुजपाशीं बाई! खड्गाचि एक भयाण." ३६५
काय देणगी तुझी तरी ही विचार याचा करितां
तिज लपवाया स्थान न लाभे कितिही शोधूं जातां ३६६
लाज वाटते तिजासि कराया धारण देहावरती
दौर्बल्यास्तव हृदयीं धरितां दडपुनि टाकी मज ती ३६७
दुःखभारमय तुझी देणगी हृदयीं नित्य धरीन
तशीच बहु सन्मानदायिनी तिजला मी मानीन. ३६८

आतां पुढतीं भीति न उरली मजला या विश्वांत
तुझाच होइल जय या माझ्या जीवनार्थ-कलहांत ३६९
सवें मृत्यु जो ठेविलास त्या अर्पिन जीवित मुकुट,
तोडाया मम पाश असे तें तीक्ष्ण खड्ग मन्निकट. ३७०

या विश्वांतीं भय दावाया समर्थ नुरलें कोणी,
क्षुद्र भूषणावरी सोडिलें आजपासुनी पाणी. ३७१
जयेच्या न मज वरकांतीं तें सौजन्य न उरणार,
मान घालुनी सलज्ज खालीं रडत न मुळिं बसणार. ३७२
खड्ग हाच मम अलंकार जें हृदयेशा! तूं दिधलें,
श्रृंगाराया वृथा बाहुल्या, कारण आतां नुरलें. ३७३

५३

सहस्रवर्णीं रत्नांनीं ज्या शोभा येउनि भेटे,
त्वत्करिंच्या त्या कंकणाहुनी खड्गचि सुंदर वाटे. ३७४
सायंकाळीं प्रकाश रविचा असतां अति आरक्त
पंख पसरुनी त्यांत भरारी मारी जो मनसोक्त. ३७५
श्रीविष्णूचें वाहन जो, त्या स्मृति होते गरुडाची,
विद्युत्सम ती चमक पाहुनी धनुराकृति खड्गाची. ३७६
अति दुःखाची साक्ष—मृत्युचा शेवटचा आघात,
सत्ताधीशा! खड्ग तुझें तें तसें असे साक्षात्. ३७७
शुद्ध सत्व जीवन ज्योति करि सर्व वासना नष्ट,
प्रखर अशा निज तेजें शोभे खड्ग तसें हें स्पष्ट. ३७८
कंकण फाराचि सुंदर जें ग्रह रत्नांनीं जडलेलें
परि प्रभो! तव खड्गचि त्याहुनि अति सुंदर घडलेलें ३७९
कल्पनाहि भयद, लावित्ये मोकलावया धाय!
अवलोकन जो करिल तयाची होइल गति मग काय? ३८०

## ५४

सोडुनि मज तूं जातां तुजला याचिलें न मी कांहीं,
उभाच होतों स्तब्ध आपलें नांवहि कथिलें नाहीं. ३८१
कूपतटाकीं तरुतळीं होती पडली तिरपी छाया,
बसलों होतों तेथें; पाणी भरीत होत्या बाया. ३८२
पाहुनि, काढुनि उच्चस्वर त्या मला म्हणाल्या वेगें—
माध्यान्हींचा समय पातला चाल आमच्या संगें. ३८३
स्वकल्पनेच्या तरंगांत मी तिथेंच झालों लीन,
केव्हां तूं आलास तयाचें नाहीं झालें ज्ञान. ३८४
उदासीनता दिसली, जेव्हां झाली दृष्टादृष्ट,
कानीं पडला शद्ब तुझा तो होता बहु अस्पष्ट. ३८५
'तान्हेला मी असे प्रवासी' शद्ब तुझे थकलेले,
कानीं येतां स्वप्नांतुनि मज जागृत त्यांनीं केलें. ३८६
आतुर झालों तुझी ऐकुनी श्रांत अशी ती वाणी,
ओंजळींत मी तुझ्या ओतिलें कलशामधुनी पाणी. ३८७
गर्द तरुच्छायेंतुनि ऐकूं आलें कोकिल गीत,
तरुपर्णध्वनिसवें पसरला सुमसौरभ मार्गांत. ३८८
पुसतां माझें नांव सलज्जाचि उभा राहिलों देवा!
माझी स्मृति तूं ठेविशील आशि काय जाहली सेवा? ३८९
तान्हेल्या तुज दिधलें जल ही हृदयीं स्मृति राहील,
समाधान वाटेल त्यापरी आनंदहि होईल. ३९०

उष:कालचा समय होउनी वेळहि अतीव झाला,
पक्षांचे हे सूर सांगती कंटाळा त्या आला. ३९१
म्लान होउनी कडु लिंबाचीं पानें फडफड करिती
त्या तरुतलिं मी बसुनि सारखा विचार करितों चित्तीं ३९२

५५

अंत:करणीं तुझ्यासारखी उदासीनता आहे,
डोळ्यावरती झोंपेची ही गुंगी खेळत राहे. ३९३
कांझ्यांतिल हें फूल करितसे राज्य तिथेंच बसून,
याची वार्ता नाहीं आली कानीं काय अजून ? ३९४
द्वाड अशा खडकाळ पथाच्या निर्जनशा एकांतीं,
बसुनि राहिला आहे माझा मित्र एक त्या प्रांतीं. ३९५
ऊठऊठ जा! वेळ रिकामा नको घालवूं येथें,
माल जाउनी माझ्या मित्रा नकोस फसवूं तेथें. ३९६
तप्त वालुका प्रदेशांतुनी जरी प्रवासी वेगें,
तृषित होउनी धांवत सुटले असति मृगजलामागें. ३९७
प्रखर रवीचा ताप करितसे कांपित आकाशातें,
ऐसें होतें ह्मणून कांहीं चिंता नाहीं मातें ३९८
हृदयाकाशीं तुझ्या नसे कां वास करित आनंद,
भासणार का नाहीं तव पदरव जणुं वीणानाद. ३९९

५६

याचमुळें आनंद तुझा मी अनुभवितों परिपूर्ण,
माझ्याठायीं झाला असमी तूंहि तसा अवतीर्ण. ४००

हे विश्वाच्या स्वामिन्! माझें अस्तित्वचि जरि नसतें
प्रेम तुझें तें सांग बरें मग कुठें राहिलें असतें? ४०१
केलें असत्ती मजहि विभागी साऱ्या संपत्तींत,
आनंदाची क्रीडा तव नित चाले मम हृदयांत. ४०२
जरी जीवनक्रम हा माझा पाहिल कुणि शोधून,
'तुझीच इच्छा व्यक्त त्यांत,' त्या येइल हेंच दिसून ४०३
प्रभो! राजराजेश्वर तो तूं केवळ या हेतूनें,
मोहाया मम हृदय, अलंकृत होसी सौंदर्यानें. ४०४
भक्तप्रेमीं लीन जाहलें प्रेम तुझें जगदीशा,
दर्शन तव व्हायाची ऐशा संयोगांतचि आशा. ४०५

५७

नेत्रांचे घे चुंबन, भरुनी राहतसे विश्वांत,
प्रकाश माझा माधुर्यातें उद्भवितो हृदयांत. ४०६
माझ्या जीवित केंद्रस्थानीं चाले त्याचें नृत्य,
प्रेमविणेच्या तारांवरि तो आघातहि करि नित्य. ४०७
स्वच्छंदानें वाहे वारा होय नभःपट दूर,
प्रकाशेंच या भूवरि होतो हास्याचाहि प्रसर. ४०८
प्रकाशसागरिं फूलपांखरूं शीड आपलें पसरी,
जाइ फुलें, कमलिनी तरंगति लाटावरतीं सारीं. ४०९
हेम-चूर्ण पसरितो ढगांवर तो आघात करून,
असंख्य रत्नें नभोमंडलीं तोच देइ उधळून. ४१०

हे माझ्या प्रियकरा ! हर्षलें दिसते प्रति तरुपर्ण,
आनंदी आनंदी चहुंकडे भरला आहे पूर्ण. ४११
स्वर्गंगा ती बुडवुनि टाकी दोन थडी भरपूर,
जिकडे तिकडे आनंदाचा लोटुनि गेला पूर. ४१२

५८

मृत्यु आणखी जीवित दोन्हीं भावंडें हीं ऐशीं,
विश्वाच्या ह्या रंगभूमिवर खेळति परस्परांशीं. ४१३
उल्हासाच्या भरें पावतां वादळासवें वृष्टि,
जागी होउनि करूं लागते हास्यहि सजीव सृष्टि ४१४
फुलून जाते पृथ्वी हिरण्यागार अशा गवतानें,
घडून येती चमत्कार हे एका आनंदानें. ४१५
अश्रूंनीं अति आर्द्र होउनी गेलें जें उमलून,
दुःखरूप त्या रक्तकमलिं जो राहे स्वस्थ बसून– ४१६
असलें नसलें सर्व जवळचें धूळित दे फेंकून,
अवाक्षरहि जो काढित नाहीं कधींच वदनांतून– ४१७
हृदयवल्लभा देवा ! माझ्या शेवटच्या गीतांत,
दिव्य अशा त्या आनंदाचे सर्वहि सूर मिळोत, ४१८

५९

तरु-पर्णीं जो सुवर्ण वर्णी प्रकाश नर्तनिं धुंद,
मेघ आळशी तसेच वाहत जाती गगनीं मंद. ४१९
मस्तक माझें शांत करी जी गोड वायुची झुळुक,
या सर्वांना जाणे मी तव कृपाच कारण एक. ४२०

प्रभातिंचा हा प्रकाश टाकी भरुनी मन्नेत्रांला,
माझ्या या हृदयास तुझा जणुं संदेशचि हा आला. ४२१
वरूनि तव मुखचंद्र बघे मज, नेत्रहि मन्नेत्रांस,
पदकमलाचा स्पर्श जाहला माझ्या ह्या हृदयास. ४२२

६०

अनंत नभ हें अचल राहिलें असुनी डोक्यावरचें,
किती तरी तें क्षुब्ध जाहलें अविश्रांत जल त्याचें. ४२३
ब्रह्मांडाच्या सागरतीरीं मुलें जमुनिया सारीं,
बागडतीं; नाचतीं सारखीं; ओरड करिती भारी, ४२४
पहा! ठेविती घरें आपुलीं वाळूनें बांधोनी,
गोळा करुनी रित्या शिंपल्या खेळ मांडिला त्यांनीं. ४२५
घेउनि पानें शुष्क बैसले विणीत निज होड्यांस,
हांसत हांसत अफाट सागरिं लोटुनि देती त्यांस. ४२६
माहित नाहीं कला तयांना मुळींच पोंहायाची,
टाकावीं कशि जाळीं सागरिं कल्पनाहि नच याची. ४२७
पाणबुडे ते उड्या टाकिती मोतीं काढायास,
बसुनि गलबतीं व्यापारी ते करिती पर्यटनास. ४२८
गोळा करिती खडे वाळुचे त्यापरि सर्वहि पोरें,
इतस्ततां मग निर्हेतुक ते फेंकुनि देती सारे. ४२९
गुप्त असे धन शोधुनि घ्याया प्रयत्न ते करिती ना
टाकावीं कशि जाळीं याची कल्पनाहि नच त्यांना. ४३०

शुभ्र किनारा मंदास्मित करि, समुद्रही मोठ्यानें--
हांसत आहे आनंदानें लाटांच्या रूपानें. ४३१

माता हलवी जशी पाळणा, तशाच त्या पोरांना,
लहरी गाती प्राणहारका अर्थरहित गीतांना. ४३२
यापरि सागर त्या पोरांच्या संगें खेळत राहे,
तत्तीरींचें मंदहास्य तें तसेंच चमकत आहे! ४३३
वादळ मारी पूर्ण भराऱ्या पथविरहित आकाशीं,
चुकुनी निजपथ फुटति तारवे आदळुनी खडकांशीं ४३४
पहा झणीं बाहेर निघाली मृत्यूची ही स्वारी,
ब्रह्मांडाच्या सागरतीरीं मुले खेळतीं सारीं. ४३५

## ६१

हां हां ह्मणतां बालक नेत्रीं येते झोंप कुठून?
या विषयींचें सांगा होतें काय कुणाला ज्ञान? ४३६
होय, येतसे ऐकण्यांत कीं अशापरीची गोष्ट,
एक अप्सरा-ग्रामा जवळाचें अरण्य आहे दाट. ४३७
असे प्रकाशित लव प्रकाशें केवळ खद्योताच्या
लोंबत असती कळ्याहि नाजुक जिथें मोहमायेच्या- ४३८
कानन वसातिस्थान असे तें बालांच्या झोंपेचें
तेथुनि येते निद्रा घ्याया चुंबन तन्नेत्रांचें. ४३९
मंदस्मित जें बालोष्ठावरि करि निद्रेंत विलास,
जनन तयाचें कोठें आहे ठाउक का कवणास? ४४०

नव पल्लवसम विवर्ण ऐसा किरण चंद्रकोरीचा--
पावे अंतर्धान असा तो मेघहि वर्षर्तूचा-- ४४१
त्या किरणानें त्या मेघाला स्पर्श जेधवां केला,
दंवस्नात ती उषा तेधवां पाहतसे स्वप्नाला. ४४२
विदित असे हो! वार्ता येते यापरि ऐकायाला,
बालक-मंदास्मित जें, त्याचा जन्म त्या स्थलीं झाला. ४४३
बालांच्या अवयवांवरी जी स्निग्ध, मधुर नव कांति,
कुणास आहे ठाउक, लपुनी कुठें आजवरि होती? ४४४
माता त्याची लहान असतां तद्धृदयीं ती कांती,
स्निग्ध मुग्ध अव्यक्त अशा त्या प्रेमें भरुनी होती. ४४५

## ६२

माझ्या बाळा! तुला खेळणीं रंगित देतों जेव्हां
रंग ढगांवर, पाण्यावर कां? कळतें मजला तेव्हां ४४६
स्वरसंयोगें कसे वीचि-रव गीत, नृत्य करितात,
धरा कशी ही होते तन्मय त्यांच्या श्रवणसुखांत. ४४७
त्वां नाचावें ह्मणुनीया मी गाणें गातों जेव्हां
तरुपर्णीं संगीत असे कां-कळतें मजला तेव्हां ४४८
तुझ्या बुभुक्षित हातीं देतों पदार्थ जेव्हां मिष्ट,
फुलांत मध कां? पक्व फलीं रस? तेव्हां कळतें स्पष्ट. ४४९
प्रकाशसंगें मोद नभांतुनि वाहुनि कैसा येतो?
झुळूक सोडुनि वायु कसा तो उष्णकालिं सुख देतो? ४५०

हंसावेस तूं ह्मणुनि तुझें मी चुंबन घेतों जेव्हां
या सर्वांच्या मद्रूपाचें ज्ञान होय मज तेव्हां! ४५१

६३

अनोळखी जे त्यांची माझी ओळख दिलीस करुनी,
तुजमुळेंच मम होऊं लागलें स्वागत परक्या सदनीं. ४५२
दूर मला जे होते, माझ्या सन्निध आणुनि त्यांना;
ठेविलेस तूं करुनि ईश्वरा! बांधव तूं परक्यांना. ४५३
चिरपरिचित मम पर्णकुटी जैं सोडुनि जावी लागे,
'जुनें राहतें, नव्यांतही तव वास' न हें मनिं वागे. ४५४
इहपरलोकीं जन्म मृत्युंनी जेथें मज नेतोस
अनंत जीवित मित्र एकटा तूंच तिथें असतोस. ४५५
जें जें कांहीं असे अपरिचित मजलागीं त्यांच्याशीं
माझ्या हृदया बद्ध करिसि तूं आनंदाच्या पाशीं. ४५६
स्वरूप कळतां तुझें एकदां परकें कांहिंच नुरतें,
ओळख पटतां तुझी कुठेंही दार बंद नच होतें. ४५७
क्रीडा करितो एकटाच जो नाटकिं या भूतांच्या,
हीच याचना, 'मुकूं नये मी स्पर्शानंदा त्याच्या' ४५८

६४

उंच दिसे तृण नदीतटाकीं निर्जनशा जागेत,
चालत होती एक बालिका घेउनि दीप करांत. ४५९
"पदराखालीं दीप झांकुनी चाललीस तूं कोठें, ?
मजला दे तो, ध्वांतें दिसतें गृह मम भयाण मोठें" ४६०

मुखाकडे क्षण तिनें पाहिले, यापरि तिजला पुसतां
गगनाभीतरिं तेव्हां थोडा संधिप्रकाश होता. ४६१
"पश्चिमेस तम दाट पसरतां दीप तिथें नेणार,
सरिज्जलौघासवें वहाया सोडुनि मी देणार" ४६२
ऐकुनि हें मी उभा राहिलों एकटांच गवतांत,
तत्क्षणिं दिधला तिनें सोडुनी दीप हळुंच पाण्यांत. ४६३
हालत होती ज्योत तयाची एकसारखी जेव्हां
वाहत जातां प्रवाहसंगें दीप पाहिला तेव्हां ४६४
अधिकाचि झाली रात शांतता जिकडे तिकडे होतां
विचारिलें मी मुलीस पुनरपि दीप मिळायाकारितां. ४६५
"लाविलेस तूं सर्व दिवे; हा दीप नेसि तूं कोठें?
दे मजला तो, ध्वांतें दिसतें गृह मम भयाण मोठें!" ४६६
क्षण पाहुनि साशंक तिनें तैं उत्तर दिधलें मजला,
'आल्यें मी हा दीप कराया अर्पण आकाशाला' ४६७
ऐकुनिया हें उभा राहुनी स्तब्ध तयाला पाहीं,
शून्य अशा निर्वातस्थानीं जळत वृथा तो राही. ४६८
मध्यरात्रिं तम पडतां पुनरपि पुसलें तिज जाऊन,
'शोध कुणाचा करिसी बाळे! हृदयीं दीप धरून' ४६९
प्रश्न ऐकतां जरा थांबुनी विचार थोडा केला,
लावुनिया टक तिनें पाहिले ध्वांतीं मम वदनाला. ४७०
उत्तर दिधलें नंतर मजला पुन्हा तिनें लवलाहें

'दीपोत्सव हा सजवाया मी दीप आणिला आहे' ४७१
उभा राहुनी पाहूं जातां आलें मजासि दिसून,
असंख्य दीपासवेंच जळला, गेला तोहि विझून ४७२

६५

भरुनी कांठोकांठ वाहत्या जीवितचषकांतून,
दिव्य कोणत्या पेयाचें तूं करूं इच्छिसी पान? ४७३
सृष्टिचालका! स्थावर जंगम दृश्य विश्व हें सारें
अवलोकावें सदा कवीशा! मन्नेत्राच्या द्वारें. ४७४
श्रवण कराया मत्कर्णें निज अखंड मधुर निनाद
काय वाटतो तुला ईश्वरा! यांतच परमानंद? ४७५
विश्व तुझें हें माझ्या चित्तीं विणीत आहे शब्द
संगीताची घालितसे भर त्यांत तुझा आनंद. ४७६
प्रेमभरें तूं स्वतांस अर्पण मज भक्ता करितोस,
आत्म-निवेदन-माधुर्याचा रसानुभव घेतोस. ४७७

६६

संधिप्रकाश असतां जी मज किंचित् भासत होती
उषःप्रकाशीं जिणें सारिला कधिंहि न बुरखा वरती. ४७८
मज्जीवाचा जीव राहिली सदैव जी होऊन
गीतमयी मी तीच देणगी शेवटची अर्पीन. ४७९
मनधरणी मीं तिची किती तरि शब्दानीं जरि केली
असेंहि करुनी परंतु मजला ती वश नाहीं झाली. ४८०

प्रार्थनेंत मी बाहु पसरुनी तिजला आलिंगाया—
उत्सुकतेनें प्रयत्न केला परि तो गेला वायां. ४८१
देशोदेशीं भटके, धरुनी हृदयाकाशिं तिलाच,
तिच्या भोंवतीं चाले माझ्या क्षयवृद्धीचा नाच. ४८२
माझ्या मनिंचे विचार, घडती क्रिया जेवढ्या माझ्या
त्या सर्वांवरि तिनेंच केलें सदा आत्म–साम्राज्या. ४८३
माझ्या स्वप्नीं, मन्निद्रेंतहि होतें तदधिष्ठान,
एकटीच ती दूर राहिली तथापि मजपासून,
माझें दारहि ठोठायासी बहुत माणसें आलीं.
शोध करुनिया तिचा, होउनी निराश परतुनि गेलीं.४८५
पाहणार तिज नव्हता; धरिला ह्मणुनि तिनें एकांत,
ज़ाणशील तूं यास्तव बसली तुझीच वाट पहात! ४८६

६७

आकाशहि तें तूंच सुंदरा! तूंच असासि घरटेंहि,
तुझ्यावांचुनी पदार्थ एकहि या विश्वांतरिं नाहीं. ४८७
वर्ण-ध्वनि-गंधाचें प्रेमें तट घरट्यास करून,
त्यामाजीं या जीवात्म्याला ठेविसि तूं कोंडून. ४८८
उषा हळुंच ये हेमकरंडक घेउनि सव्य करांत,
सौंदर्याचा हार घालित्ये वसुधेच्या कंठांत. ४८९
कळप गुरांचा एकहि जेथें न दिसे रानांतून,
शांत आणखी निर्जन ऐशा पटांगणाच्या वरुन— ४९०

शीत, शांतिमय मंद वायुचा सुवर्ण घट घेऊन,
संध्या येते विश्रांतीच्या पश्चिम सिंधुकडून. ४९१
परि त्या तिकडे पहा पसरलें अनंत महदाकाश,
मिळावयातें जीव खगातें उडावया अवकाश. ४९२
विमल धवलशा तेजातें तें राज्य अकंटक जेथें,
दिवस न, रात्र न, शब्दाचें तर नांवच नाहीं तेथें. ४९३

६८

सूर्यकिरण तव या पृथ्वीवर लांब बाहु पसरून,
उभा राहतो माझ्या दाराजवळ पहा येऊन. ४९४
माझे अश्रू, माझीं गीतें, निश्वासहि घेऊन,
उभा दिवसभर राहुन तवपदिं पोंचवितो नेऊन. ४९५
तारामय तव वक्षःस्थल तें मोदप्रसन्नतेनें,
झांकिसि तूं गा! विरल धूम्रमय मेघाच्या शेल्यानें. ४९६
असंख्य रूपें असंख्य आकृति देसी त्या शेल्यास,
पालटणाऱ्या एकसारख्या सुंदर नव रंगांस. ४९७
हा तव शेला नाजुक हिमयुत, रंगहि गहिरा त्याला,
गंभीरा! निर्मला! ह्मणुनि तो फार आवडे तुजला. ४९८
तेणें त्याच्या शोकजनकशा छाया बहुत पडून,
शुभ्रोज्ज्वल अत्युग्र जातसे प्रकाश तव झांकून. ४९९

६९

रक्तवाहिन्यांतून धावतो जीवन-निर्झर तोच,
अखिलहि विश्वीं तालसुरावर करीत आहे नाच. ५००

८५०७

पर्ण--सुमाच्या रूपें उसळित लाटा आनंदानें,
फुटून ये वर तृणांकुरांच्या असंख्यांत रूपानें. ५०१
भवांबुधीच्या पाळण्यांत घे जन्ममृत्युचे झोके,
ओहोटी तशि भरती तेणें जीवनास त्या न चुके. ५०२
विश्वींच्या जीवन--स्पर्शानें या माझ्या गात्रांचा-
अनुभव हा प्रत्यक्ष येतसे भाग्योदय झाल्याचा. ५०३
अनादि ज्याचें स्फुरण वाहतें रुधिरीं, जीवन तेंच,
वाटे त्याचा गर्व मला परि त्याचें कारण हेंच. ५०४

७०

घोर भयद त्या मोदसिंधुच्या लाटांवरि आदळुनी,
बनुनि छिन्नविछिन्नहि जावें तद्रूपाचि होवोनी. ५०५
ताल बद्धताऽनंदें व्हावें त्वांहि प्रमुदित फार,
काय गोष्ट ही तुझ्या ईश्वरा ! सामर्थ्याबाहेर. ५०६
सर्वहि भूतें एकसारखीं धांवत जाती पुढतीं,
कांहीं केल्या स्थिर नच होती; मागें वळुनि न बघती ५०६
खेंचुनि मागें घेइल वेगें निश्चित सर्वांनाही,
कर्तुमकर्तुं शक्तिहि ऐसी दिसत कुठें ती नाहीं. ५०८
अविश्रांत हा नाच होतसे त्याच्या तालसुरांत,
ऋतुहि पाउलें टाकित नाचत येउनिया जातात. ५०९
गंधस्वर वर्णहि विश्वाच्या मुदमय कारंज्यांत,
जलधारापरि एकसारखे ओतलेच जातात. ५१०

चमत्कार त्या आनंदाचा सांगावा तरि काय ?
पदोपदीं तो विखरुनि, शोषुनि नष्ट होउनी जाय. ५११

७१

मीच कदाचित् -- अहंभाव मम मजलागीं जो झाला,
व्यापक होउनि दाहि दिशांनीं आहे तो भरलेला. ५१२
शुभ्र विमल तव तेजोरूपीं बहु रंगाच्या छाया—
अशा प्रकारें पडल्या; करित्ये हाहि खेळ तव माया! ५१३
आत्मारूपीं करिसी देवा ! विघ्न तूंच उत्पन्न,
निजरूपाच्या भिन्न दशेला नांवें देसी भिन्न. ५१४
निजरूपाचें त्वां केलेलें पृथक्करण जें नामी,
असें तयाचें व्यक्तरूप जें तोच जाहलों हा 'मी'. ५१५
हृदयद्रावक या गीताचा प्रतिरव पसरे गगनीं,
भासमान भय --हास्य—वासना-- अश्रूंच्या रूपांनीं. ५१६
लाटा उसळति वर तळिं येती; स्वप्नें पडती जाती,
तूंच आपुली करून घेसी विटंबना मचित्तीं. ५१७
धरुनि कुंचला दिनरात्रींचा रंगवुनी चित्रास,
अफाट ऐसा पडदा हा तूं उभारला आहेस! ५१८
गूढ अशा त्या चमत्कारमय आश्चर्यें भरलेलें—
आकृति ज्याची वर्तुळ ऐशा तंतूंनीं विणलेलें. ५१९
त्या पडद्याच्या पलीकडे तूं ऐसा आसनिं बससी,
सरळ शुष्क जे निरुपयुक्त ते तंतू सोडुनि देसी. ५२०

प्रदर्शनचि हें तुझें आणखी माझें भरलें आहे,
आकाशीं जें व्यापुनि सर्वहि पूर्णपणानें राहे. ५२१
भोंवतालचें दाहि दिशांचें सर्वहि वातावरण,
'मी तूं,' 'मी तूं' याच सुरांनीं भरलें आहे पूर्ण. ५२२
लपंडाव हा खेळत असतां परस्परांच्या संगें,
पुढें युगेच्या युगेंहि जातिल गेलीं जैशीं मागें. ५२३

७२

जो परमात्मा अंतर्यामीं-- हृदयीं करितो वास,
गूढ स्पर्शें जागृति देतो तो मम जीवात्म्यास. ५२४
मस्तकावरि तोंच टाकितो निजमायेचा पडदा,
हृदयविणेच्या तारा छेडुनि काढुनि विविध निनादा. ५२५
मायाजालहि तोच विणी मग त्यांत रंग भरि सारे,
निळे रुपेरी हिरवे पिवळे घडिघडि पालटणारे. ५२६
पदकमलाचें दर्शन देतो मायाजाळांतुनि तो,
होतो चरणस्पर्श, तदा मी स्वतास विसरुनि जातों. ५२७
नामरूप-- सुखदुःखांची तो ठेवुनि पुढतीं कोडीं,
येती दिन, जातात युगें पारि हलवुनि हृदया सोडी. ५२८

७३

मुक्ति मिळाया कुणी सांगती त्यागाची ती युक्ति,
त्यागानें जी प्राप्त होतसे नको मला ती मुक्ति. ५२९
आनंदाच्या सहस्रपाशीं बद्ध जाहलों असतां,
आलिंगन मज मुक्तिच देते, अनुभवितों हें आतां. ५३०

ज्यामाजी ते भरले असती रंग किती तरि विविध,
तशांत करितो भूषित ज्याला मधुर जयाचा गंध. ५३१
अभिनव ऐसें मद्य ओतिसी जगदीशा ! दिनरात्र,
भरुन काढिसी कांठोकांठहि तेणें मृण्मय पात्र. ५३२
त्वज्ज्योतीनें विश्व आपुल्या दीपा ज्वलित करून,
मंदिरांतल्या वेदीपुढतीं ठेविल त्या मांडून. ५३३
बहिर्मुख अशी दशेंद्रियें जीं; कोणतेंहि तद्द्वार,
छे ! देवा ! छे ! कधींच नाहीं निबद्ध मी करणार. ५३४
पदोपदीं जो मोद पावती चक्षु–स्पर्श–श्रोत्र.
तुझ्याच आनंदाचे वाहक होइल मत्प्रतिगात्र. ५३५
जळुनि मोहपट आनंदाचा प्रकाश तो होईल,
मनोरथांना भक्तीचीं मग पक्वफळें येतील ! ५३६

७४

दिन मावळला पृथ्वीवरती तम गेलें पसरून,
वेळच ही जल आणायाची ओढ्यावर जाऊन. ५३७
झोंबे वारा, ओढ्याचें तें उदास वाटे गीत,
अहा ! गाउनी मला ह्मणे कीं, 'ये ये अंधारांत'. ५३८
कुणिहि नाढळे मनुष्य एकहि शून्य जाहल्या वाटा,
सोसाट्यानें वाहे वारा; जलीं उसळती लाटा. ५३९
परत घरीं मी येइन ह्मणुनी विश्वास न मज वाटे,
निश्चित कांहीं न ये सांगता कोण पथीं मज भेटे. ५४०

घांटासन्निध लहान होडी, अनोळखी माणूस--
तिच्यांत बसुनी वाजवीतसे मधुर अशा वेणूस. ५४१

७५

तुझ्या देणग्या सर्वहि आशा मर्त्यांच्या पुरवून,
कमी न होतां तशाच जातो तुझ्याकडे परतून. ५४२
नदीस देवा ! नित्याचें निज कर्म करावें लागे,
शेतांतुनि, खेड्यांतुनि धांवे एकसारखीं वेगें. ५४३
तथापि यापरि अविश्रांतसा प्रवाह सरितेचा तो--
त्वत्पदकमला प्रक्षाळाया वळसे घेतचि जातो. ५४४
निजगंधें करि पुष्प वायुला सुगंधयुक्त परंतु--
आत्मार्पण तुजलाच करावें त्याचा अंतिम हेतु. ५४५
उपासनेनें तुझ्या पडेना वाण जगीं कांहींच,
इष्टार्थाचि कवि--शब्दापासुनि घेतां अंतिम तूंच. ५४५

७६

जीवितेश्वरा ! प्रतिदिनिं सन्मुख स्थित मी झालों असतां,
प्रत्यक्षाचि तव दर्शन होइल काय जगाच्या नाथा ! ५४७
द्वयकर जोडुनि उभा राहिलों जरि मी तुझ्यासमोर
सांग ईश्वरा ! काय तुझा मज होइल साक्षात्कार ? ५४८
गगनवितानातळीं पाहुनि शांतस्थल एकांत,
दिसेल का मुखकमलहि धरितां नम्र भाव हृदयांत. ५४९
जीवनकलहें नितांत कष्टें भरलेल्या या जगतीं,
एकसारखी करित धावपळ लोक सर्वही सुटती. ५५०

उभा राहुनी अशांत ऐशा बहुजनसंमर्दांत,
दर्शन होइल काय तुझें मज विश्वपते! साक्षांत. ५५१
विश्वांतिल मम काम संपुनी मुग्ध उभा मी असतां–
तुझ्या मुखाचें दर्शन होइल काय मला भगवंता! ५५२

७७

'अससी तूं मम देव,' असें मी निजचित्तीं कल्पून,
विभक्तपण तें धरुनि राहतों तुटक तुझ्यापासून. ५५३
'तुझाच आहें अंश,' अशी ही भावना न करिं कांहीं
त्यायोगानें अधिक तुझ्या मी सान्निध येतचि नाहीं. ५५४
लोटांगण मी पदीं घालितों मानुनि तुजला तात,
'मित्र' मानुनी परि न घालितों स्वकर तुझ्या हातांत ५५५
'तुझाच मी' हें मानुनि येसी तूं आपण होऊन,
दृढालिंगनें निर्भय होतों नच तुज 'मित्र' गणून. . ५५६
ज्येष्ठ असासि तूं मजला देवा! सर्वहि भावंडांत,
परि मज त्याची क्षिति तिळभरही नच वाटे चित्तांत ५५६
वांटुनि निजधन तयां, करावीं तुष्ट सर्व भावंडें,
सर्वस्वाचि निज अर्पावें तुज, परि हें कांहीं न घडे ५५८
सुखदुःखीं मी बनुनि विभागी साह्य करावें त्यांना,
उपासना तव अशा प्रकारें माझ्याकडुनि घडेना. ५५९
वाटे भय; मज धैर्य न, पाणी जीवावर सोडाया,
चित्जलधीच्या अथाक उदकीं खोल उडी टाकाया ५६०

७८

नवीन होती अगदीं जेव्हां सृष्टि आपुली सर्व,
चमकत होतें तारांचेंहि प्रथमचि तेज अपूर्व. ५६१
तेव्हां नभिं सुरसभा भरवुनी मंगल गाती स्तोत्र,
आनंदचि हा विशुद्ध कीं हें असे पूर्णता चित्र. ५६२
तत्क्षणिं त्यांतुनि एक सभासद मोठ्यानें ओरडला,
" वाटे ऐसें, प्रकाशांत या खंड कुठें तरि पडला. ५६३
उणीव थोडी पूर्णत्वाला असे इथें निःशंक,
दिसे हरपली तारकांतुनि अरे ! तारका एक " ५६४
वीणेची तै तटकन् तुटुनी पडली सुवर्ण-तार,
गीत थांबलें करूं लागले सर्वहि हाहाःकार. ५६५
" हाय ! तारका होती सगळ्या तारांचेंही नाक,
आकाशाचें वैभव मुख्यचि होती ती-ती एक" ५६६
त्या दिवसांपासून चाललें काम तिच्या शोधाचें,
आर्तरवानें असें सांगणें परस्परांना त्यांचें- ५६७
" जगांत असती नानापरिचे जे आनंद अनेक,
तिच्या अभावीं नष्टच झाला त्यांच्यामधुनी एक. ५६८
प्रशांत रात्रीं नभीं तारका पुटपुटतात हंसून,
' शोध सुरांचा वृथा, पूर्णता असे अखंड भरून. ५६९

७९

या जन्मीं तव दर्शन नशिबीं नसल्या, मन्मनिं ठेव,
' मुकलों मी तव दर्शनास कीं, ' संततही जाणीव. ५७०

विस्मृति याची व्हावी देवा ! क्षणहि न मच्चित्तांत,
या दुःखाच्या तीव्र वेदना स्वप्नांतहि होवोत. ५७१
इहलोकींच्या भरल्या हाटीं उगाच भटकत असतां,
आयुष्याचे दिवसहि जातां मुठी धनानें भरितां. ५७२
अजुनि अरेरे ! कांहिंच नाहीं करुनि घेतला लाहो,
मनीं निरंतर मला ईश्वरा ! असेंच वाटत राहो ! ५७३
होउनि सदनीं समारंभ तो, नसतो कशास तोटा,
गायन--वादन जिकडे तिकडे, हंशाहि पिकतां मोठा ५७४
अशा समयिं मी दिलें न तुजला आमंत्रण गेहांत,
याची जाणिव असो सदोदित देवा ! मच्चित्तांत. ५७५

## ८०

शारदीय तो मेघ निरर्थक भटके आकाशांत,
तशीच माझी असे अवस्था देवा ! या लोकांत. ५७६
स्पर्शें तव नच पाणी झालें घनत्व तें वितळून,
तुझ्या प्रकाशीं झालों नाहीं समरस मी मिसळून. ५७७
तुझ्या वियोगें महिने वर्षें बसलों मी मोजीत,
आयुष्याचा काळ राहिलों कसा तरी कंठींत. ५७८
अखंड वैभवशाली भगवन् माझ्या प्रियतम सूर्या !
ऐकुनि घे या प्रार्थनेस मम सत्वरि तेजोवर्या ! ५७९
अशीच लीला करूं इच्छिसी देवा ! जरि तूं चित्तीं,
जीवितपट हा असार नश्वर सत्वरि घे निजहातीं. ५८०

रंग चढवुनी विविध, मुलामा सोन्याचा दे त्यास,
वाऱ्यावर तो सारे पाहशिल विविध चमत्कारास. ५८१
आटोपाया खेळ इच्छिशिल रात्रिच्या समयांत,
जाइन मी तैं पूर्ण वितळुनि दाट अशा तिमिरांत. ५८२
उषःकालचें हास्य धवल जें, समरस होइन त्यांत;
किंवा होइन अदृश्य निर्मल सूक्ष्म अशा अनिलांत. ५८३

८३

घालविले मी दिवस आपुले व्यर्थचि आलस्यांत,
त्या दुःखाचें शल्य टोंचतें ह्मणुनी मच्चितांत. ५८४
व्यर्थचि गेला काल अशी ही वृथाच वाटे भीति,
कारण माझ्या प्रतिक्षणाची व्यवस्थाच तव हातीं. ५८५
बीजाचें तें पोषण होउनि अंकुर त्या फुटतात,
वृक्षालागीं कलिका येउनि; पुढें फुलें येतात. ५८६
फलरूपानें परिणति होते प्राप्त तया पुष्पासी,
वस्तुमात्रि तूं गुप्त राहुनी सर्वहि कामें करिसी. ५८७
श्रांत होउनी अगदीं पडतों शय्येवरती जेव्हां,
कामें झालीं स्तब्ध जगांतिल; वाटे मजला तेव्हां. ५८८
परंतु बघतां उद्यानीं निज उठुनी प्रातःकालीं,
दृष्टिस पडती असंख्य पुष्पें नानापरि भंवतालीं. ५८९

८२

अनंतकाला ! शासन कर्ता अससी देवा ! तूंच,
तुझ्या पळाचे गणन कराया समर्थ ना कोणीच. ५९०

दिनरात्री या एकामागुनि एक एक जातात,
विकास पावुनि युगें फुलासम म्लान पुढें होतात. ५९१

स्वस्थपणानें एकसारखी वाट पहात रहावें,
आहे हे राजाधिराज! तुज एकट्यास हें ठावें. ५९२

वनीं कराया परिणत एका चिमुकल्याच पुष्पास,
शतकाचीं हीं शतकें जाती लोटुनि या कार्यास. ५९३

कालाच्या ह्या अपव्ययाची सोय मानवा नाहीं,
घेतलेंच पाहिजे साधुनी जें जें घेतां येई. ५९४

जो तो माझा वेळ घेतसे वितंडशा वादांत,
तुझ्या चिंतनीं संधिच न मिळे साऱ्या दिवसभरांत. ५९५

मंदिर होइल तुझें बंद तें, यापरि भीति धरून,
सायंकालीं लगबगिनें मी पाहतांचि जाऊन. ५९६

निर्भय होतों तेव्हां कां कीं मंदिर असतें उघडें,
विलंब करुनी गेलों ऐसें कधींच देवा! न घडे. ५९७

८३

माझ्या या दुःखाश्रु-मौक्तिकां गुंफुनि हार करीन,
मातुश्री! तो प्रेमानें मी तव कंठीं घालीन. ५९८

पदभूषेस्तव सर्व तारका जमुनी आकाशांत,
प्रकाशमय तोरड्या कितीतरि सिद्ध पहा करितात. ५९९

परंतु मी जीं सिद्ध करविलीं तींच भूषणें मात्र,
वक्षःस्थल तव भूषवावया निश्चित होतिल पात्र. ६००

कीर्ति तशी ती लक्ष्मी यांची प्राप्ति तुझ्यापासून,
'द्यावी किंवा नाहीं;' सारी गोष्ट तुझ्या स्वाधीन. ६०१
या दु:खावर मात्र सर्वदा माझी सत्ता आहे,
त्यातें करितों अर्पण तेव्हां प्रसादफल मी लाहें. ६०२

८४

वियोगदु:खा प्रसार मोठा सर्वत्रचि या जगतीं,
अनंत गगनीं अनंतरूपें त्याचीं जन्मा येतीं. ६०३
एका ताऱ्यापासुनि दुसऱ्या ताऱ्यांच्या पर्यंत—
शांत निशेच्या समयीं असतें टक लावून पहात— ६०४
पर्जन्यांतिल गाढ तमींच्या सळसळशा ध्वनिंतून,
त्या दु:खाचें हृदयद्रावक येतें रूप दिसून. ६०५
प्रेम आणखी इच्छा यांची मिळे अवस्था यास,
शोक तसा आनंद घडे तो त्यायोगें दृष्टीस. ६०६
माझें हें कविहृदय या क्षणीं द्रवुनि पहा जाऊन,
काव्यरूप हा प्रवाह वाहे याचमुळें त्यांतून. ६०७

८५

देवसभेंतुनि निघतां प्रथमाचि या साऱ्या योध्यांनीं,
अस्त्र, शक्ति, चिलखतें ठेविलीं कुठें बरें लपवूनी ! ६०८
तेव्हां झालीं त्यांच्यावरती बहु बाणांची वृष्टि,
त्या योगें ते अनाथ दिसले होउनिया अति कष्टी. ६०९
देवाच्या घरिं सर्व परतले पुनरपि योद्धे जेव्हां,
शक्ति आपुली कुठें ठेविली झांकुनि त्यांनीं तेव्हां. ६१०

खड्ग, बाण तिज ठेवुनि खालीं वरिलें शांतिस वेगें,
देवाघरीं ते गेले; उरले मात्र पराक्रम मागें. ६११

८६

उल्लंघुनि अज्ञात समुद्रा पाचाराया मजला,
तुजकडुनी तव दूत मृत्यु तो आला मत्सदनाला. ६१२
अंधारी ही रात्र; भीतिनें धडकी भरली फार,
भक्तिरूप तो दीप घेउनी उघडे ठेविन दार. ६१३
स्वागत करुनी त्यास करिन मी साष्टांग प्रणिपात,
माझ्या दारीं उभा ठाकला खचित तुझा हा दूत. ६१४
द्वयकर जोडुनि अश्रुपूर्ण मम नेत्रीं त्या पूजीन,
तत्पादिं अर्पुनि सुखसर्वस्वहि त्यातें सत्कारीन. ६१५
करुनी निजकर्तव्य मृत्यु तो परत पुन्हा जाईल,
परंतु सर्वहि मम आनंदा निजसंगें नेईल. ६१६
मग माझ्या त्या उदास सदनीं तुज अर्पायासाठीं,
हीनदीन मम बुद्धि तेवढी राहिल माझ्या गाठीं. ६१७

८८

आतुरतेनें एकसारखी संतत धडपड करितों,
चिमुकल्याच घरकुल्यांत माझ्या तिजला शोधित फिरतों ६१८
जातें जें तें नष्टचि होतें लहान या सदनांत,
मंदिर तव निस्सीमचि; आलों शोधित निज दारांत. ६१९
सुवर्णमंडपिं उभा प्रतिदिनीं राहुनि सूर्यास्तास,
आतुर नेत्रीं बघतों देवा तुझ्याच मुखचंद्रास. ६२०

पहा अनंतत्वाच्या ठेलों कांठावर येऊन,
कांहीही नच नाश पावतें कधिही त्याच्यांतून. ६२१
आशा–सौख्यें असतीं तेथें या मानवजातीचीं,
आप्तजनांचीं घडलेलीं तीं दर्शनेंहि शेवटचीं. ५२२
रिक्त असे हे देवा ! माझें असार जीवितपात्र,
अगाधशा त्या सौख्यसागरीं टाक बुडवुनी मात्र. ५२३
मुकलें आहे तव रूपाच्या ज्या मधुर स्पर्शातें,
पुन्हां घेउं दे एकवार तो अनुभव त्याचा मातें. ५२४

८८

तुटल्या तारा अगा मोडक्या देवळांतल्या देवा !
स्तुति नच गाती साह्य न करिती तुझ्या न घेती नांवा. ५२५
'झाला पूजासमय' असें नच सांगे घंटा नाद,
सभोंवतींचें वातावरणहि शांत तसे निःशब्द. ५२६
अशा तुझ्या त्या उदासवाण्या मंदिरिं कारि संचार,
वासंतिक हा वायुसारखा मारी भटक्या फार. ५२७
वासंतिक कुसुमांची त्या क्षणिं उद्गम वार्ता आणी,
परि तीं सुमनें पूजनिं तुजला अर्पण न करी कोणी. ५२८
आतुर होउनि एकसारखा तो प्राचीन पुजारी,
पात्र न होउनि कृपाप्रसादा सदैव भटक्या मारी. ५२९
स्थापितांच साम्राज्य येउनि धूळ अस्तमानीं ती,
छाया-प्रकाश एकदांच ही तिच्यांत मिळुनी जाती. ५३०

तुझा उपासक थकुनि भुकेनें व्याकुळ फारच होतो,
तुझ्या मोडक्या मंदिरांत तो परत तेधवां येतो. ५३१
उत्सव-दिन ते पुजेवांचुनि गेले आपोआप,
तैशा गेल्या रात्रीं; मंदिरिं परि न लाविला दीप. ५३२
या लोकीं जे केवळ असती प्रवीण ठक विद्येंत,
नव्या मंदिरीं नव्याच मूर्ती स्थापन त्या करितात. ६३३
परंतु त्यांची तीच दशा जैं वेळ तया येईल,
विस्मृति--गंगा--प्रवाहांतरी गुप्त त्याहि होतील. ६३४
जीर्ण अशा त्या मंदिरांतल्या पूजिती न देवातें,
एकसारखी हेळसांड ती भक्तांकडुनी होते. ६३५

८९

शब्दांचें अवडंबर नलगे धनी इच्छितो हेंच,
आतां मी बसणार येथुनी करित कानगोष्टीच. ६३६
आजपासुनी गुप्त अशी ही मद्‍हृदयाची वाणी,
व्यक्त पहा होईल यापुढें केवळ गातां गाणी. ६३७
देवानें बाजार भरविला; जमले लोकहि सारे,
करिति धांवपळ एकसारखे देवघेव करणारे. ६३८
वेगानें काम चालतां विश्रांतिस घे मीच,
माध्यान्हाच्या कालीं ह्मणजे वेळेला भलत्याच. ६३९
वेळ नसे तरि मम उद्यानीं फुलुनि फुलें येवोत,
येउनि मधुमक्षिका तयांवरि गुंजन करित बसोत. ६४०

पाप कोणतें पुण्य कोणतें विचार करितां याचा
व्यर्थच गेला काळ कितीतरि माझ्या आयुष्याचा ६४१
माझ्या मित्रा इच्छा झाली मन्मन आकर्षाया
परि न कळे मज कशास करितों खटाटोप हा वायां ६४२
मृत्यु येउनी ठोठाविल तो ज्या दिवशीं दारास
काय बरें तूं त्या वेळेला अर्पण करिशिल त्यास ६४३
माझें जीवित-सर्वस्वाचि मी पादें अर्पण करणार
पाहुण्यास त्या रिक्त करानें कधिं न जाउं देणार ६४४
श्रमसातत्यें संसारांतिल झालेली पैदास
वासंतिक त्या सुंदर रात्रीं, शारदीय ते दिवस— ६४५
या सर्वांचा बहर तयाच्या चरणावरि अर्पीन
मदंतकालीं मृत्यु बसे जरि दाराशीं येऊन ६४६

९१

हे मृत्यो ! या जीवदशेचें अंतिम फल तूं असशी
वास्तव येउनि करीं एकदां कानगोष्ट माझ्याशीं ६४७
सुखदु:खें तीं केलीं सारीं सहन आजपर्यंत
प्रतिदिवशीं मी बसलों आहें तुझीच वाट पहात ६४८
प्रेम परिस्थिति, आशा, माझें वित्तादिक जें आहे
हळूंच न कळत मला, तुजकडे प्रवाह यांचा वाहे ६४९
हे यमराजन् ! कटाक्ष अंतिम दे मजवरि फेंकून
झालें माझें अखंड जीवन समज तुझ्या आधीन ६५०

तूं माझा पति, तूं मम वल्लभ तुझाचि मज आधार
त्वरें घाल कंठांत गुंफिला तुझ्याचसाठीं हार ६५१
विवाह होतां जीवनवधु ही पहिलें गृह सोडील
समागमाचें सुखें रात्रींच्या एकांतीं भोगील ६५२

९२

दृष्टि आपली शेवटची या विश्वावरि फेंकीन
शेवटचा मी पडदा घेइन डोळ्यावर ओढून ६५३
शांतपणानें ठोकणार मी रामराम जगताला
दिवस असा येणार कधीं तरि निश्चित ठावें मजला ६५४
प्रभात होइल त्यापरि रात्रीं चमक नभीं ताऱ्यांची
सिंधुलहरिपरि सुखदुःखांच्या उसळतील बहु वीचि ६५५
करितों जेव्हां विचार चित्तीं अशा अंतकालाचा
तट जातो भंगून तेधवां माझ्या जीवदशेचा ६५६
मृत्यु--दीप--तेजानें उजळे वस्तुजात--भांडार
अधम स्थिति कीं तुच्छ जीव तैं विरळा दिसतो फार ६५७
करीत होतों व्यर्थचि धडपड ज्या वस्तूंच्या करितां
प्राप्त होउनी नष्टहि झाल्या तरि नच त्यांची चिंता ६५८
परि मी ज्यांची नित्य उपेक्षा केली तुच्छ गणून
त्याच मात्र होवोत यापुढें पूर्णपणें स्वाधीन ६५९

९३

आज्ञा झाली मद्बंधूनों ! निरोप द्या मज वेगें
नमस्कार मी करुनि शेवटीं निज मार्गाला लागें ६६०

ह्या घ्या किल्ल्या, घरावरिल मी सोडुनि दिधली सत्ता
वदा अंतिचे गोड शब्द तरि, हेंच मागणें आतां ६६१
तुमचा माझा बहु दिवसांचा होता जरि शेजार
तरि माझ्याहुन तुमचे मजवरि असती बहु उपकार ६६२
या अंधाऱ्या घरकुल्यांत मम प्रकाश ज्याचा होता
मालवला तो दीप; उगवला पूर्णपणें दिन आतां ६६३
देवाघरचें आलें आहे आमंत्रण मजलागीं
परलोकीं यात्रेस जावया सजलों मीही वेगीं ६६४

९४

मन्मित्रांनों ! प्रयाणसमयीं द्या मज आशीर्वाद
अरुणानें आरक्त बनुनि नभ मार्ग दिसे हा विशद ६६५
रिक्त करें मी असा निघालों; पुसूं नका, 'मज कां हें ?'
परंतु माझें हृदय मात्र हें आशापूर्णच आहे ६६६
हार आणिला विवाहार्थ तो गळ्यांत मी घालीन
प्रवाशापरी नाहीं नाहीं वेष मदीय मलीन ६६७
माझ्या मार्गीं जागोजागीं असती दंगे धोपे
माझें मन परि त्या भीतीनें तिळमात्रहि नच कांपे ६६८
सायंकाळीं प्रवास माझा ज्या वेळीं संपेल
शुक्राची ती शुभ्र चांदणी क्षितिजावर येईल ६६९
संध्या-समयीं वाद्यांचे ते उदासवाणे सूर
राजमंदिर—द्वारापासुनि पडतिल मग बाहेर ६७०

९५

प्रथमच जीवित देहलीस मी आलों ओलांडून
मुळिंच राहिलें नाहीं मजला त्या घटकेचें भान ६७१
अरण्यांतली कळी फुलाची रात्रीच्या मध्यास—
फुलून राहे सहज ज्यापरी पावुनि पूर्ण विकास— ६७२
ज्या शक्तीनें विश्वीं माझी जीवनकलिका विकसे
त्या शक्तीचें खरें रूप जे असेल तरि तें कैसें ? ६७३
उषःकालचा प्रकाश जेव्हां माझ्या नेत्रीं दिसला
परका नच मी जगतीं ऐसें गमलें तेव्हां मजला ६७४
नामहि नाहीं रूपहि नाहीं, ऐशा त्या ईशानें
मजला आलिंगिलें वाटलें मातेच्या रूपानें ६७५
त्याच परी अज्ञात धनी तो मी मृत झालों जेव्हां
सदैव माझा परिचित आहे; असें भासलें तेव्हां ६७६
येथें असतां, प्रेम असे तें मत्प्राणांवर जैसें
हेंहि जाणतों कीं तें राहिल मृत्युवरीही तैसें ६७७
बाळातें स्तनपान कराया घे ओसंगीं माता
काढी सव्य स्तनापासुनी करि तें तें आक्रांता ६७८
परि ती वामस्तनास देई त्याचें मुख लावून
तैं तें बालक शांत होतसे समाधान पावून ६७९

९६

जेव्हां मी जाईन येथुनी निघो असा उद्गार—
अवलोकन मी केलें जें तें होतें निरुपम फार ६८०

प्रकाश जलधीवरी कमल जें पावे नित्य विकास
धन्य जाहलों, गुप्त तयाच्या चाखुनि मकरंदास ६८१
अनंतरूपीं भरलेल्या या क्रीडाभुवनावरती
खेळ खेळतां दिसली मजला प्रभुची अरूप मूर्ति ६८२
थरारली मम गात्रें शिवतां प्रभु तो स्पर्शातीत
असेल येथें होणारा तरि खुशाल होवो अंत ! ६८३

९७

अजाणता मी तुझ्या बरोबर देवा ! खेळत असतां
'कोण असासि तूं?' प्रश्न असा हा शिवला नाहीं चित्ता
लज्जा किंवा भीति कधींही मज शिवल्या नाहींत
तेव्हां होतों बंड खरोखर जगदीशा ! अत्यंत ६८५
गल्लोगल्लीं मज फिरवाया प्रभातींच येऊन
मित्रापरि होतास करित तूं जागें झोपेंतून ६८६
त्यासमयीं होतास ह्मणत तूं मजसाठीं जीं गीतें
अर्थ कळाया त्यांचा नव्हतों करित मुळीं यत्नातें ६८७
त्या गीतांच्या चाली त्यांचे सूर मात्र काढून
केवळ मी त्या आनंदांतच जात असे रंगून ६८८
सांप्रत परि ते क्रीडेचे दिन गेले सर्व निघून
एकाएकीं गेली माझी भावनाहि बदलून ६८९
अनुभव येतो मला नवा जो, नवेंच दर्शन होतें
काय असे हा चमत्कार हें कांहीं न कळे मातें ६९०

शांत तारका-पुंज पाहुनी भयें विस्मयें मात्र
तुझ्याच चरणाकडे लागले सर्व जगाचे नेत्र ६९१

९८

अपजय-माला ध्वजा तयांचा करिन तुला आहेर
दूर पराभव करणें माझ्या सामर्थ्याबाहेर ६९२
नष्ट होउनी अहंभाव मम जीव-ग्रंथि तुटेल
पूर्णपणें मी जाणें; तेव्हां कष्ट फार होतील ६९३
हृदय रिकामें नीरस माझें झालेलें दुःखानें
वंशापरि तें स्फुंदत राहुनि गीताच्या रूपानें— ६९४
एकामागुनि एकसारखे टाकिल जे सुस्कारे
तेव्हां रानीं रडूं लागतिल पाषाणहि मग सारे ६९५
आहे मजला पूर्ण विदित कीं कमलदलें कासारीं
सदैव मिटलेलीं न राहतां विकसतील तीं सारीं ६९६
त्यांतिल मधु जो मधुर असा तो जेथें गुप्त असेल
स्थलहि मला तें स्पष्टपणानें मग दृष्टीस पडेल ६९७
नील नभांतुनि नेत्र कटाक्षहि मजवरि कुणि फेंकील
हळूंच करुनी खूण वाटतें मजला बोलावील ६९८
माझ्यासाठीं-किंवा माझें कांहीं नच राहील
निर्याणाची प्राप्ति पुढें मग पदविनता होईल ६९९

९९

सोडितांच मी कार्य आपुलें उचलुनि तें घेशील
तळमळ माझी व्यर्थ; योग्य जें तें केलें जाईल ७००

माझ्या हृदया ! स्वस्थ रहा तूं असासि जिथें ज्या स्थानीं
करुनि निराशा सहन आपणा भाग्यवंत समजोनी ७०१
मंद वायुची झुळुक येउनी मालवले मम दीप
लावूं जाता विसरुनि जातों मग उरलेला व्याप ७०२
परि मी सांप्रत वाट पहाताचि आसन हें पसरून—
सावध बसतों ध्वांतीं, येशिल तेव्हां बस येऊन ७०३

## १००

नामरूपमय महा सिंधुच्या बुडी तळाशीं देतों
निराकार तें मौक्तिक घ्याया आशा मी बाळगितों ७०४
जुन्या पुराण्या फुटक्या तुटक्या ह्या नौकेंत बसून
यापुढतीं जलपर्यटनाच्या भरीस मी न पडेन ७०५
भवसिंधूच्या लाटावरती चेंडूसरशीं केलि-
करावयाची वेळ सुखाची आतां निघून गेली ७०६
तारांची मुळिं छेडतां न होतां सहजोमचि जयाची
असें जिथें संगीत- अशी जी शाळा-संगीताची— ७०७
जाइन तेथें जीवनरूपी वीणा मी घेऊन
उत्कंठित बहु झालों व्हाया अमृतत्त्वांतचि लीन ७०८
अनंत जो प्रभु सुरांस त्याच्या मीहि लावितां सूर
शब्द पडे मग हृद्वीणेचा शेवटचा बाहेर ७०९
शांतिपूर्ण झालेली माझी निःशब्दाची वाणी
करीन अर्पण शांतपणें त्या शांतमूर्तिच्या चरणीं ७१०

१०१

जुन्या भूमिकेंतुनि मज नेती नव्या भूमिकेमाजीं
त्वत्प्राप्तिस्तव अशीं गायिलीं सदैव गीतें जीं जीं ७११
त्यांच्या साह्यें जेव्हां केला शोध आत्मतत्वाचा
अंतर्मुख मी होउनि बघतां स्पर्शहि झाला त्याचा ७१२
जें जें कांहीं शिकलों तें त्या गीतांनींच शिकविलें
जितुके कांहीं गूढ मार्ग ते त्यांनीं मज दाखविले ७१३
हृदयाकाश-क्षितिजावरि जे चमकत असती तारे
त्या गीतांनीं पहा आणिले दृष्टीसमोर सारे ७१४
सुखदुःखांच्या प्रदेशांतलीं गूढ रहस्यें जीं जीं
त्यांनीं तीं उकलूनि दाविलीं सर्वहि दिवसांमाजी ७१५
प्रवास माझा संपत येतां या संध्यासमयास
मला आणिलें बरें कोणच्या राजमहाद्वारास ? ७१६

१०२

त्यास जाणिलें बाळगिला मी डौल असा हा मोठा
'ज्ञान तुझें मज झालें' ऐसा भरला होता ताठा ७१७
तुझींच चित्रें लोक पाहती माझ्या ग्रंथ-कृतींत
'कोण असा ?' ह्मणुनि येउनी प्रश्न असा करितात ७१८
उत्तर द्यावें काय कळे ना मज त्यांच्या प्रश्नास
'नये सांगतां नये सांगतां' ह्मणुनी ह्मणतों त्यांस ७१९
निंदा मम उपहास करित जन निघून जाती जेव्हां
हांसत तूं बसतोस ईश्वरा ! एकसारखा तेव्हां ७२०

तुझ्या कथा वर्णितों अखंडित गीतें मी गाऊन
त्यायोगें बाहेर पडे मम गुह्यहि हृदयांतून ७२१
नानापरिंचे लोक येउनी मजसि असें पुसतात–
सांग तुझे आह्मास सर्वही अभिप्राय साद्यंत ७२२
उत्तर द्यावें काय कळे ना मज त्यांच्या प्रश्नांस
'मद्गीतांचा अर्थ जाणतों कोण ?' ह्मणे मी त्यांस ७२३
ऐकुनि हें मज तुच्छ गणुनि ते निघून जाती जेव्हां
हांसत तूं बसतोस ईश्वरा ! एकसारखा तेव्हां ७२४

१८३

हे प्रिय भगवन ! मदिंद्रियें हीं पावुनि पूर्ण विकास
तव चरणांचा स्पर्शहि होवो ! इहलोकांतच त्यांस ७२५
आषाढीं घन लोंबे घेउनि जलधारांचें ओझें
तव दारासीं नम्र तसें हें चित्त असूं दे माझें ७२६
भिन्न स्वर ते एकच करुनी सर्वहि गीतें माझीं
मिळोत एका प्रवाहेंच तीं शांति समुद्रामाजीं ७२७
वास जयांचा हिमाचलाच्या मानस सरोवरांत–
जाया नीडाकडे मनीं जे उत्कंठित अत्यंत– ७२८
राजहंस ते असे ज्यापरी जाती नित्य उडून
शाश्वत सद्माकडेच राहो ! जीव तसा लागून ७२९
या गोष्टी सर्वही घडाव्या देवा ! सत्यपणानें–
नम्रपणानें तुज केलेल्या एका प्रणिपातानें ७३०

# आश्रमाचीं पुस्तकें.

**१. पहाट-तारा.**
कवि-पार्थिव, कांत व कृष्णाकुमार.
यांची निवडक कविता. किं. ८६.

**२. महाजनांची कविता** ( भाग १ )
कविवर्य महाजनांची निवडक स्फुट
कविता. किं. काग. १ काप. १।८.

**३, कविसंमेलन.** [ भाग २. रा. ]
मोंगलाईतील आधुनिक कवींचें नव-
नीत. संपादक- दे. ल. महाजन.
किं. १. रु.

**४ महाराष्ट्र गीतांजलि**
कविसम्राट टागोर बाबूंच्या गीतांज-
लीचा अनुवाद. अनुवादक—
**दे. ल महाजन.** किं. -॥।-

**५. लज्जित खंजीर** ( खंडकाव्य )
कवि कांत ( छापत आहे. )

**६. कांटेरी मुगुट.** ( नाटक ,, ,, )

---

शारदाश्रमाची—

वर्षांतून ] **विहंग - माला.** [ १० पु.
मनोरंजक विविध मजकूर, सुंदर कविता
भारदस्त लेख. वाटेल तेव्हां पासून वर्गणी
दार होतां येतें, वा. वर्गणी १।।।- रु.

व्यवस्थापकः—

‘ **विहंग - माला** ’ ( कार्यालय )

शारदाश्रम —नांदेड.

REFBK-0004507

REFBK-0004507